


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २४७, मंगळवार १८ जुन २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# आरक्षणाचे घोंगडे किती दिवस भिजत ठेवणार?

## ■ खासदार नीलेश लंके यांचा सवाल ■ लंके यांनी घेतली मनोज जरांगे पाटील यांची भेट

छ.संभाजीनगर : विशेष प्रतिनिधी

**जरांगे पाटलांच्या ज्या मुळ मागण्या आहेत, त्यावर लवकरात लवकर तोडगा निघाला पहिजे. आरक्षणाचे घोंगडे किती दिवस भिजत ठेवणार आहात असा सवाल करीत खासदार नीलेश लंके यांनी जरांगे पाटील समाजासाठी लढा देत आहेत. त्यांना पाठींबा देण्यासाठी आपण सर्वजण असतोच. संघर्ष मात्र जरांगे पाटलांना करावा लागतो. त्यांना वेदना सहन कराव्या लागतात, त्याग करावा लागत असल्याचे जरांगे पाटील यांची भेट घेतल्यानंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले.**

जरांगे पाटील यांनी आरक्षणाच्या मुद्दावर उपोषण सुरू केल्यानंतर अलिकडेच मंत्री शंभुराज देसाई यांच्या मध्यस्थीने हे उपोषण मागे घेण्यात आले. उपोषणानंतर जरांगे यांना छत्रपती संभाजीनगरच्या खाजगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून शनिवारी रात्री लंके यांनी रूग्णालयात जाऊन त्यांच्या तब्येतीची विचारपुस केली. जरांगे यांच्या भेटीनंतर लंके यांनी डॉक्टरांशीही चर्चा केली. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, जरांगे पाटलांनी समाजासाठी आजवर जो लढा उभा केला आहे. तो उभा करताना त्यांनी जीवाची पर्वा केली नाही. मी आता डॉक्टरांशी चर्चा असता ज्यावेळी जरांगे यांनी या संघर्षासाठी सुरूवात केली त्यावेळी त्यांचे वजन ५१ किलो होते. त्यानंतर त्यांनी उपोषण केल्यानंतर त्यांचे वजन ९ किलोने घटून ४२ किलो झाले. आज तर त्यांचे वजन ३६ किलोपर्यंत कमी झाले असून ही चिंतेची बाब आहे.

### आता तोडगाच निघाला पाहिजे

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, संबंधित विभागाचे मंत्री महोदय, राज्यातील नेते मंडळींनी जरांगे पाटलांच्या मागण्यांचा विचार करून लवकरात लवकर तोडगाच निघाला पाहिजे अशी माझी अपेक्षा असल्याचे लंके म्हणाले.



■ खासदार नीलेश लंके यांनी औरंगाबाद येथील रूग्णालयात उपचार घेत असलेले मनोज जरांगे पाटील यांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपुस केली.

### इतिहासात प्रथमच मंत्रालयाला टाळे

राज्याच्या इतिहासात कधीही मंत्रालयाला टाळा ठोकला गेला नाही. याच प्रश्नासाठी आम्ही मंत्रालयालाही टाळा ठोकला होता.आज माझ्या मायबाप जनतेच्या आशिर्वादाने मला केंद्रात जाण्याची संधी मिळाली. संसदेत या विषयावर प्रश्न उपस्थित केला जाईल. कशा पध्दतीने ही लढाई जरांगे पाटील जिंकतील यासाठी मी केंद्र सरकारमध्ये प्रयत्न करणार असल्याचे लंके यांनी सांगितले.

### कागदपत्रांच्या नावाखाली पळवाट नको

मंत्री शंभुराज देसाई यांनी आश्वासन दिल्यानंतर जरांगे पाटील यांचे उपोषण मागे घेण्यात आले. मात्र आश्वासने दिल्यानंतर त्याची पुर्तता होत नाही. त्यामुळे जरांगे यांना पुन्हा आंदोलन करावे लागते या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, कागदपत्रांची पुर्तता करून कोणतीही पळवाट न सांगता लवकरात लवकर तोडगा काढला पाहिजे. गेल्या अनेक वर्षांपासूनच हा लढा आहे. आपण कितीतरी वेळा याच मुददयावर कागदपत्रे संकलीत करीत आहोत. काही गोष्टींच्या पुर्ततेसाठी पळवाट काढण्यापेक्षा ठोस तोडगा काढणे गरजेचे आहे असे लंके यांनी सांगितले.

### संसदेत आवाज उठवावाच लागेल

लोकसभेत राष्ट्रवादीचे खासदार म्हणून तुम्ही जाणार आहात, संसदेमध्ये हा प्रश्न तुम्ही लावून धरणार का ? या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, संसदेत या प्रश्नावर आवाज उठवावाच लागेल. ज्यावेळी मी आमदार म्हणून काम करत होतो त्यावेळी आम्ही १०-१५ आमदारांनी आंदोलन केले. महात्मा गांधींच्या पुतळयाजवळ एक दिवसांचे लाक्षणीक उपोषण केले. राजभवनामध्ये राज्यपालांची भेट घेऊन त्यांचे या प्रश्नाकडे लक्ष वेधले होते याची आठवणही लंके यांनी करून दिली.

### जरांगेंशी चर्चा करताना गहिवरून आले

जरांगे पाटलांशी काय चर्चा झाली असे विचारले असता, मला खरोखरच जरांगे पाटलांच्या प्रकृतीची चिंता वाटते. आपण इतिहासामध्ये राष्ट्रपुरूष पाहिले. त्यागी पुरूषांचा इतिहास पाहिला. आज मी जरांगे पाटलांसारख्या त्यागी माणसाशी चर्चा केली त्यावेळी मलाही गहिवरून आले. समाजासाठी किती त्याग करावा ? त्याचे आपण मुल्यमापन करू शकत नाही. मी डॉक्टरांशी चर्चा करताना जरांगे पाटलांच्या प्रकृतीची काळजी घेण्याची विनंती केल्याचे लंके म्हणाले.

### विशेष अधिवेशनासाठी अध्यक्षांना पत्र देणार

या महिन्यात विधानसभेचे अधिवेशन होत आहे. या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी तुम्ही विशेष अधिवेशनाची मागणी करणार का या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, मी त्या सदनाचा आता सदस्य नसल्याने मी अध्यक्ष महोदयांना पत्रव्यवहार करून विशेष अधिवेशन बोलविण्याची विनंती करणार आहे.

### जरांगेंच्या आंदोलनाचा फायदा

बीड लोकसभा मतदारसंघात बजरंगबप्पा सोनवणे यांना जरांगे पाटलांच्या आंदोलनाचा प्रभाव दिसून आला, त्याचा फायदा आपणास झाल्याचे सोनवणे यांनी मान्य केले, तुमच्या मतदारसंघात आंदोलनाचा फायदा झाला का या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, जरांगे पाटलांच्या आंदोलनाचा माझ्यामतदारसंघातही मला फायदा झाला. मात्र माझ्या मतदारसंघात संमिश्र परिस्थिती होती. पण निश्चित फायदा झाला यात शंका नाही जरांगे पाटलांसोबत काम करणाऱ्या अनेक सहकाऱ्यांनी आपल्यासाठी काम केल्याचे लंके म्हणाले.

# शिक्षकांच्या हातून शिक्षक आमदारकी केंव्हाच निसटली !

## राजकीय फॅक्टर प्रभावी







**विधानपरिषदेच्या** नाशिक शिक्षक मतदारसंघात २१ उमेदवार निवडणूक रिंगणात असले तरी खरी लढत महायुतीतील शिवसेना शिंदे गटाचे विद्यमान आमदार किशोर दराडे, महायुतीचे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे महेंद्र भावसार, महाविकास आघाडीचे शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे संदीप गुळवे आणि अपक्ष विवेक कोल्हे हे प्रमुख उमेदवार आखाडयात आहेत.

महसूलमंत्री राधाकृष्ण विखे यांचे बंधू राजेंद्र विखे यांनी माघार घेतली. मात्र टीडीएफचे भाऊसाहेब कचरे आणि अप्पासाहेब शिंदे गेल्या निवडणूकीप्रमाणे यावेळी शड्डू ठोकून आहेत. अप्पासाहेब शिंदे यांचे वडील स्व. रा.ह.शिंदे हे शिक्षक आमदार होते. स्व. बाळासाहेब विखे यांनीच त्यांना निवडून आणण्यास संपूर्ण राजकीय ताकद पणाला लावली होती. विखे यांनी एकेकाळी शिंदे यांना निवडून आणले त्याच बाळासाहेब विखे यांचे चिरंजीव राजेंद्र विखे यांनी माघार घेतली. त्यांनी फेसबुक पोष्टद्वारे निर्देशित केले. पण बाळासाहेब विखे यांनी माजी आमदार रा.ह.शिंदे यांना निवडूण आणले त्यांचे चिरंजीव अप्पासाहेब शिंदे हे निवडणूक रिंगणात आहेत. यावेळी अत्यंत मातब्बर उमेदवार निवडणूक मैदानात असलयाने ही लढत चौरंगी नव्हे तर बहुरंगी आणि बहुढंगी होण्याची चिन्हे दिसतात.

उमेदवार बेपत्ता होणे, त्यांनी अचानक माघार घेणे, संजीवनी कारखान्यावर सलग तीन वेळा सरकारी छापे पडणे, शिक्षकांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या टीडीएफ म्हणजे शिक्षक लोकशाही आघाडीची निवडणूकीत चार शकले झालीत. यापूर्वी त्यांची अशी राजकीय वाताहत कधीच झाली नव्हती. शिवसेना ठाकरे गट पक्षाचे उमेदवार यांनी टीडीएफचे उमेदवार असल्याचे म्हटले होते. टीडीएफने नगरच्या माध्यमिक सोसायटीचे भाउसाहेब कचरे यांना उमेदवारी घोषीत केली. तर दुसऱ्या गटाने अप्पासाहेब शिंदे यांना उमेदवारी दिली. आता आणखी एका गटाने विवेक कोल्हे यांना पाठींबा दिला. असाच घोळ महायुतीमध्ये आहे. शिवसेना शिंदे गटाचे आमदार किशोर दराडे, आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे धुळयाचे महेंद्र भावसार आमने-सामने आहेत. या मतदारसंघाच्या राजकीय इतिहासावर दृष्टीक्षेप टाकला तर यापूर्वी अशी अभूतपूर्व राजकीय स्थिती कधीच उद्भवली नव्हती. परिणामी या निवडणूकीत पहिल्यांदाच प्रचंड राजकीय चुरस निर्माण झाली आहे.

विधान परिषदेच्या नाशिक शिक्षक मतदारसंघात नाशिक, अहमदनगर, धुळे, जळगांव आणि नंदुरबार या पाच जिल्हयांतील ५४ तालुक्यांतील सुमारे ७० हजारांहून अधिक मतदार आहेत. खाजगी प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक, सिनिअर कॉलेजचे प्राध्यापक हे या मतदारसंघातील मतदार असतात. सेवानिवृत्त शिक्षकांना मतदानाचा अधिकार नाही. विशेष म्हणजे विधान परिषद अस्तित्वात आल्यानंतर १९६२ च्या दरम्यान नगरचे फलके गुरूजी पहिले आमदार झाले.१९८५ च्या निवडणूकीत नगरचे रा.ह.शिंदे आमदार झाले. त्या काळात अहमदनगर पुणे शिक्षक मतदारसंघाला जोडलेला होता. साधारणतः १९९० नंतर अहमदनगर जिल्हा उत्तर महाराष्ट्राच्या नाशिक शिक्षक मतदारसंघात समाविष्ट झाला. त्यानंतर अहमदनगर जिल्हयातून एकही शिक्षक आमदार झालेला नाही. नाशिक मतदारसंघातून आतापर्यंत टी.ए.पवार, मालेगांव, जी.यू.नाना ठाकरे, साक्री, धुळे, नाना बोरास्ते नाशिक, दिलीप सोनवणे जळगांव, अपूर्व हिरे नाशिक, किशोर दराडे येवला, नाशिक यांनी आमदार म्हणून प्रतिनिधीत्व केले आहे. नाशिक शिक्षक मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करण्याची राजकीय संधी आतापर्यंत नगर जिल्हयाला मिळाली नसली तर विधान परिषदेच्या नाशिक पदवीधर मतदार संघात ना स फरांदे, पुढे डॉ. सुधीर तांबे, आणि आता विद्यमान आमदार सत्यजित तांबे प्रतिनिधीत्व करीत आहेत.

शिक्षक मतदारसंघात नगर जिल्हयातील आमदार का निवडून येत नाही ? यावेळी ती संधी मिळण्याची शक्यता निर्माण झालेली दिसते. निवडणूकीत जेवढी चुरस निर्माण होईल तेवढी अधिक संधी नगर जिल्हयाला मिळू शकते. त्यात कोणाची लॉटरी लागते ते लवकरच स्पष्ट होईल. अर्थात कोण शिक्षक आमदार होणार यापेक्षाही हा मतदारसंघ केंव्हाच शिक्षक मतदारांच्या हातून सुटला आहे. राजकीय साठीमारीत शिक्षक नव्हे तर शिक्षण संस्था चालक आमदार होऊ लागले आहेत. डॉ. अपूर्व हिरे, किशोर दराडे यांच्या शिक्षण संस्था आहेत. यावेळचे उमेदवार दराडे, विवेक कोल्हे हे संस्था चालकच उमेदवार आहेत. शिक्षकांच्या हातून शिक्षक आमदारकी केंव्हाच निसटली त्यामुळे अन्य राजकीय फॅक्टर प्रभावी ठरत आहेत.



# चंदेरी

## रिधिमा डिसेंबरमध्ये शुभमन गिलसोबत करणार लग्न? काय आहे सत्य...



**टेलिव्हिजन अभिनेत्री रिधिमा पंडितबद्दल बातम्या आल्या होत्या की ती क्रिकेटर शुभमन गिलसोबत लग्न करत आहे. अखेर तिने आपण शुभमन गिलसोबत लग्न करत नसल्याचे स्पष्ट केले आहे. डिसेंबर २०२४ मध्ये रिधिमा आणि शुभमन विवाहबंधनात अडकणार असल्याची चर्चा सुरू झाली होती. त्या चर्चेला आता पूर्णविराम मिळाला आहे. अशा चर्चेत तथ्य नसल्याचे रिधिमाने स्पष्ट केले आहे.**

रिधिमाने नुकताच तिच्या इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. ज्यात तिने म्हटले आहे, की मला अनेक पत्रकारांचे कॉल येत होते. त्यांना माझ्या लग्नाबद्दल जाणून घ्यायचे होते. मी लग्न करत नाही आणि जर माझ्या आयुष्यात इतकं महत्त्वाचं काही घडत असेल तर मी स्वतः पुढे येऊन त्याची घोषणा करेन. या बातमीत अजिबात तथ्य नाही, असे मी त्यांना स्पष्टपणे सांगितले. शुभमन गिलने लग्नाच्या चर्चेवर अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. याआधी अफवा पसरल्या होत्या की तो क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरची मुलगी सारा तेंडुलकरला डेट करत आहे. रिधिमा आणि शुभमनचे लग्न डिसेंबर २०२४ मध्ये जयपूर (राजस्थान) येथे होऊ शकते. दोघेही त्यांच्या लग्नाला गुप्त ठेवू इच्छित आहेत. या कथित लग्नात फोन आणि मीडिया कव्हरेजला परवानगी दिली जाणार नाही, अशाही अफवा पसरल्या होत्या.

### कोण आहे रिधिमा

बहु हमारी रजनीकांत आणि खतरा खतरा सारख्या टेलिव्हिजन शो व्यतिरिक्त, रिधिमा २०२१ मध्ये बिग बॉस ओटीटी सीझन १ मध्ये देखील दिसली आहे. २०१९ मध्ये तिने फियर फॅक्टरः खतरों के खिलाडी ९ मध्ये देखील भाग घेतला आणि ती दुसरी उपविजेती ठरली.

## आई, पत्नी अन् आता तरुणी मुलीची भूमिका साकारणार सायली!



टीव्ही अभिनेत्री सायली साळुंखे पुकार दिल से दिल तक या मालिकेत दिसणार आहे. यापूर्वी तिने पत्नी आणि आईची भूमिका साकारली आहे. आता ती मुलीच्या भूमिकेत दिसणार आहे. यासाठी ती खूप उत्सुक आहे. याआधीही तिने पडद्यावर आईची भूमिका साकारली होती. वेगवेगळ्या प्रकारची पात्रे साकारून प्रेक्षकांना चकित करण्याची प्रत्येक कलाकाराची इच्छा असते. त्यामुळेच टीव्ही अभिनेत्री सायली साळुंखे तिच्या पुकार दिल से दिल तक या नवीन शोमध्ये तिच्या भूमिकेबद्दल खूप उत्सुक आहे. सायली तिच्या मागील बातें कुछ अनकही सी या मालिकेत एक समजूतदार पत्नी आणि आईच्या भूमिकेत दिसली होती. या वेळी ती एका तरुण मुलीची भूमिका साकारत आहे. या मालिकेतील वेदिका या भूमिकेला सायली स्वतःच्या अगदी जवळची मानते. सायलीच्या म्हणण्यानुसार, मी माझ्या दोन मालिकांत अशा भूमिका केल्या आहेत ज्या तीस-पस्तीस वर्षांच्या प्रौढ मुलीच्या, एका मुलाची आई आणि या पात्रांच्या होत्या. माझ्यापेक्षा पूर्णपणे वेगळे होत्या. वेदिका ही २६ वर्षांची बबली मुलगी आहे. ती स्वतः आईपासून विभक्त झालेली मुलगी आहे. नुकताच अभ्यास पूर्ण केला. वेदिका सायलीच्या वैयक्तिक आयुष्यात जवळ असेल तर मग आव्हानात्मक भूमिका कोणती वाटते, याबद्दल ती म्हणाली, की खरे तर गेल्या दोन वर्षांपासून मी आईच्या भूमिकेत एवढी साचेबद्ध झाली आहे की ती मातृत्वाची शैली माझ्या वागण्यात आपोआप येते. मी कोणाशी बोलले तर आपोआप हो बेटा म्हणते. त्यामुळे स्वतःला त्यातून बाहेर काढून मुलीच्या भूमिकेत आणणे हे माझ्यासाठी आव्हान आहे.

### सायली टाईपकास्ट होण्यावर बोलली...



सतत आईची भूमिका साकारताना टाइपकास्ट होण्याची भीती वाटत नव्हती का? यावर सायली म्हणते, की टाईपकास्टचा मुद्दा असता तर मला ही भूमिका मिळाली नसती. दोन शोमध्ये सारख्या भूमिका करूनही जर निर्मात्यांनी मला ही भूमिका दिली असेल तर याचा अर्थ आता टाईपकास्ट असे काही राहिलेले नाही. मला स्वतःवर पूर्ण विश्वास होता की, पस्तीस वर्षांच्या आईची भूमिका साकारल्यानंतर मी कॉलेज पास झालेल्या मुलीचीही भूमिका करू शकते आणि बघा, मी ते करतेय, असे सायली म्हणाली.

# प्रतीक्षेनंतच मिळते गोड फळ!

## आहाना कुमराने केले बॉलीवूड इंडस्ट्रीबद्दल रोचक खुलासे...



**दीड दशकापासून हिंदी चित्रपटसृष्टीत सक्रिय असलेली आहाना कुमरा इंडस्ट्रीतील कोणत्याही गटाचा भाग बनलेली नाही किंवा तिला बनण्याची इच्छाही नाही. ती संयमाची कदर करते आणि थोड्या प्रतीक्षेनंतर त्याचे गोड फळ अनुभवते. अलीकडेच, अहाना लखनऊला आली, जिथे तिने ऑडिशन, ग्रुप्स, कॉमेडी यातून इंडस्ट्रीमध्ये बाहेरचे असण्याचे तोटे उघडपणे सांगितले. कलाक्षेत्रात सध्या ऑडिशन्स एक विनोद बनला आहे, कारण ते आमच्याकडून ऑडिशन घेतात, पण शेवटी फक्त मोठ्या अभिनेत्रीच फायनल करतात, अशी टिप्पणीही आहानाने केली...**




यावेळी दिलेल्या विशेष मुलाखतीत आहानाने सांगितले, की मधल्या काळात मी दोन वर्षे काम केले नाही. पण त्यानंतर रजत कपूर आणि पूरब कोहलीसोबत डेहराडूनमध्ये महिनाभर शूटिंग केले. हा चित्रपट आजच्या पालकांना आणि मुलांना डोळ्यासमोर ठेवून बनवण्यात आला आहे. आजकाल आई-वडिलांमध्ये अनेक मतभेद पाहायला मिळतात. अशा परिस्थितीत त्यांच्या भांडणात सहा-सात वर्षांचे मूल भरडले जात असते. आजकाल घटस्फोटही अगदी सामान्य झाले आहेत. मी आईची भूमिका साकारत असून पूरब वडिलांची भूमिका साकारत आहे, तर रजत कपूर माझ्या वडिलांची भूमिका साकारताना दिसणार आहे. आईची भूमिका साकारताना मला भीती वाटत नाही. जर मी आता आईची भूमिका केली नाही तर ८० व्या वर्षात करेन का? आजच्या हिरोइन्सना अशा स्टिरिओटिपिकल भूमिकांमध्ये अडकायचे नसते. मी नेहमीच काहीतरी नवीन करण्याचा प्रयत्न करते. मी कधीच आईची भूमिका केली नव्हती. मला कथा आणि कलाकार आवडले म्हणून मी लगेच तयार झाले. याशिवाय मी एक ॲक्शन मालिकाही करत आहे, असे आहाना म्हणाली.

### घराणेशाही सगळीकडेच...

आहाना म्हणाली, की चित्रपटसृष्टीत लोक फक्त आपल्या मुलांना काम मिळवून देण्याचा प्रयत्न करतात. अर्थात असे कोणतेही क्षेत्र नाही, जिथे घराणेशाही नाही... कलाक्षेत्रात पहिल्यांदाच काम मिळणे अवघड आहे. विशेषतः मुलींसाठी. मला पहिल्यांदा काम मिळायला लागेपर्यंत १० वर्षे उलटून गेली होती. आजचा काळ असा आहे की, मोठ्या नियतकालिकांमध्ये प्रतिष्ठित व्यक्तींच्या मुलांची छायाचित्रे छापली जातात, तर आपल्यासारख्या बाहेरच्या लोकांपर्यंत पोहोचायला १०-१५ वर्षे लागतात. महिलांसाठी परिस्थिती अधिक कठीण आहे. कारण त्यांच्यासाठी भूमिका लिहिल्या जात नाहीत. ज्या काही चांगल्या भूमिका लिहिल्या जातात त्याही कुणाच्या तरी मुलीला, कुणाच्या भाचीला किंवा निर्मात्याच्या नातेवाईकाला दिल्या जातात. मी दोन वर्षे काम केले नाही. मी घरीच बसून राहिले. लोक म्हणाले कोणतेही काम हाती घे. मी म्हणाले का घेऊ? ही माझी इच्छा आहे, मी ते करणार नाही. मी आजवर चांगले काम केले आहे, भविष्यातही चांगले काम करेन. वाट बघायला माझी हरकत नाही. खरं तर, वेटिंग गेम कलाकारांसाठीच बनवला जातो. येथे जितका संयम ठेवाल तितके गोड फळ मिळेल. आता संयमाची फळे गोड मिळत आहेत, असेही आहानाने सांगितले.

### मी अभिनेता आहे, नेता नाही...

फार पूर्वी मुझफ्फरनगरमधील एक पक्ष मला तिकीट देत होता. मला हसू फुटले. सुरुवातीला मला वाटले की हा एक विनोद आहे. तेव्हा तो गंभीरपणे म्हणाला की आम्हाला खरेच तुम्हाला तिकीट द्यायचे आहे. मी म्हणालो का देत आहेस मला? मी अभिनेता आहे, नेता नाही. वेळ मिळेल तेव्हा सामील होऊ पण आता नाही. माझी आई पोलिसांत आहे. आमच्या घरात दिवसभर राजकारणाचीच चर्चा असते. आपण फक्त बातम्या आणि राजकारण बघतो. आमच्या घरात हे वाद-विवाद सुरू असतात, असेही आहानाने सांगितले.



### मी कोणत्याही गटाची भाग नाही आणि होणार नाही...

आहानाने सांगितले, की मी आधीही नव्हते, आताही नाही आणि भविष्यातही मी कोणत्याही गटाचा भाग होणार नाही. सगळ्यांनाच वाटतं की तुम्ही मोठ्या लोकांच्या पार्ट्यांमध्ये जाल, त्यांच्यासोबत सोशलाइज कराल, डिनर कराल, पण माझ्याकडे या सगळ्यासाठी वेळ नाही. मधल्या काळात मी काही काम केले नाही. मी फक्त संपूर्ण भारताचा दौरा केला. भारताला भेट देऊन खूप मजा आली. कारण आपल्यासारखा दुसरा देश नाही. दक्षिण आणि उत्तर किती वेगळे आहेत? सगळीकडे नवी संस्कृती, नवी संस्कृती आहे. जेवणही ठिकाणानुसार बदलते. मी जगभर फिरले आहे पण भारतातील आदरातिथ्य इतरत्र कुठेही नाही. ट्रॅव्हल शो दरम्यान मला नवीन लोकांना भेटण्याची आणि नवीन कथा ऐकण्याची संधी मिळाली. मी एक वर्ष फक्त प्रवास केला.

### लोकांना वाटते की नायिका विनोदी नसतात...

आहाना म्हणाली, की प्रेक्षकांना रडवणे सोपे आहे पण हसवणे कठीण आहे. जेव्हा मी सँडविच फॉरएव्हर शो केला तेव्हा माझ्या टीममध्ये माझ्याकडे अतुल कुलकर्णी होता, ज्यांना कधीही कॉमेडीची ऑफर आली नव्हती. मला एक चांगला कॉमेडी शो मिळाला हे मी स्वतःला भाग्यवान समजते. खरे तर असे शो येणे सोपे नसते. लोकांना वाटते की मुली मजेदार नसतात, विशेषतः नायिका. आम्ही सँडविच... केल्यावर अतुल भावूक झाला होता. तो म्हणाला, अरे यार, मला विनोदी भूमिका कोणी देत नाही. मी म्हणायचो, अशा भूमिकाही मला कुणी देत नाही. आम्हा दोघांची कथा एकच आहे. आम्ही झाकीर भाई, दिव्या सेठे, अतुल, कुणाल, लेखक भरत कुकरेजा आणि पंकज सुधीर मिश्रा यांचा एक सुंदर ग्रुप तयार केला. आता आम्ही एकमेकांना सँडविच म्हणतो. आम्ही ते कोविडदरम्यान शूट केले आणि लोकांनी ते फक्त कोविड दरम्यान पाहिले.

**बॉलीवूड अभिनेत्री विद्या बालन सध्या खूप रील बनवत आहे आणि आता तिने ही सवय कशी आणि का लागली हेदेखील सांगितले आहे. आता ती येथे सतत तिच्या चाहत्यांचे मनोरंजन करत आहे.**

## विद्या बालनला लागलेय रिल बनवण्याचे वेड

विद्याने दोन वर्षांपूर्वी सोशल मीडियावर एन्ट्री केली होती. आता ती रील बनवत आहे. सोशल मीडियावर रील बनवण्याचा आणि व्हायरल होण्याच्या तिच्या अनुभवाविषयी बोलताना विद्या म्हणाली, की सुमारे दोन वर्षांपूर्वी मी लंडनमध्ये नियात या चित्रपटाचे शूटिंग करत होते, त्यादरम्यान माझ्याकडे खूप वेळ होता. माझ्या व्यवस्थापकाने मला विचारले की आपण रील का बनवत नाही. त्यानंतर तिने गंमत म्हणून ही रील बनवली. ती रील इतकी व्हायरल झाली की विद्याला मग रीलबद्दल



आकर्षण वाटू लागले. आता तर ती रीलच्या जणू प्रेमात पडल्यात जमा आहे. ती तिच्या चाहत्यांचे मनोरंजन करण्यासाठी सोशल मीडियावर सतत रील बनवत आहे. इन्स्टाग्रामवर ९.४ दशलक्ष फॉलोअर्स असलेली ही अभिनेत्री म्हणाली, की मी एक-दोन महिन्यात रील बनवत असे. माझ्याकडे रील शूट करण्यासाठी वेळ होता आणि मी फक्त मजा करत होते. जेव्हा ते व्हायरल झाले तेव्हा मला समजले की मला जे आवडते ते मी केले आणि लोक त्याचा आनंद घेत आहेत. म्हणून मी ते नियमित करू लागले. शिर्षा गुहा दिग्दर्शित दो और दो प्यार या रोमँटिक कॉमेडी चित्रपटात विद्या शेवटची पडद्यावर दिसली होती. यात प्रतीक गांधी, इलियाना डिक्रूझ आणि सेंधिल राममूर्ती यांच्याही भूमिका आहेत. विद्या लवकरच भूल भुलैया ३ या आगामी चित्रपटात दिसणार आहे. ती पुन्हा एकदा मंजुलिकाच्या भूमिकेत प्रेक्षकांचे मनोरंजन करणार आहे. या चित्रपटात विद्यासोबत कार्तिक आर्यन आणि तृप्ती डिमरी देखील दिसणार आहेत. २००७ मध्ये रिलीज झालेला भूल भुलैया पार्ट वन प्रियदर्शनने दिग्दर्शित केला होता. त्यात अक्षय कुमार, शायनी आहुजा, अमिषा पटेल, परेश रावल, राजपाल यादव, मनोज जोशी, असरानी आणि विक्रम गोखले यांचाही समावेश होता. हा चित्रपट ३२ कोटी रुपयांच्या छोट्या बजेटमध्ये बनवण्यात आला आहे. पण २००७ चा आठवा सर्वाधिक कमाई करणारा हिंदी चित्रपट म्हणून उदयास आला होता. या चित्रपटाने जगभरात ८२.८३७ कोटी रुपयांची कमाई केली होती.

## मलायका अन् अर्जुन कपूरमध्ये सर्वकाही अलबेल!; ५ वर्षांपासून देताहेत एकमेकांना साथ

मलायका अरोरा आणि अर्जुन कपूर यांचे नाते तुटलेले नाही. हे आम्ही म्हणत नसून त्यांच्या मॅनेजरनेच तसे सांगितले आहे. मलायका आणि अर्जुनबाबत अशी चर्चा सुरू झाली होती, की दोघांत बिनसलेय आणि ते वेगळे होणार आहेत. पण वास्तवात दोघेही एकमेकांच्या प्रेमात खंबीरपणे उभे आहेत.

गेल्या काही दिवसांपासून मलायका अरोरा आणि अर्जुन कपूर यांच्या ब्रेकअपच्या बातमीने अनेक चाहत्यांच्या जिवाला घोर लावला होता. ही बातमी पसरल्यापासून प्रत्येकजण त्यांच्या नात्याबद्दल अंदाज लावत आहे. मलायका आणि



अर्जुन अनेकदा लोकांसमोर येतात आणि एकमेकांसोबत पोज देतात. या जोडीला सर्वात हॉट जोडी देखील म्हटले जाते. २०१८ मध्ये दोघानी आपले नाते अधिकृतरित्या जाहीर केले होते. मलायकाच्या मॅनेजरने ब्रेकअपच्या अफवांचे स्पष्टपणे खंडन केले. हे बॉलीवूड जोडपे वेगळे झाले आहेत का, असे विचारले असता व्यवस्थापक म्हणाला, नाही, नाही, या सर्व अफवा आहेत. २०२२ मध्येदेखील त्यांच्या ब्रेकअपच्या अशाच बातम्या सोशल मीडियावर पसरल्या होत्या. मलायकासोबतचा फोटो पोस्ट करून अर्जुनने या बातम्यांवर प्रतिक्रिया दिली होती. तिने एका चिठ्ठीसह कॅप्शन दिले आहे की, संशयास्पद अफवांना जागा नाही. सुरक्षित राहा. आनंदी रहा. लोकांना शुभेच्छा द्या. आम्ही तुम्हा सगळ्यांवर प्रेम करतो...

# कौतुकाच्या थापेला मी मिस करेल!

**राऊत सर** हे आमचे शिक्षक. विज्ञानवादी मार्गदर्शक. वास्तवाशी सत्य जोडून काम करताना मिळविलेल्या यशानंतर राऊत सरांनी नेहमीच पाठीवर कौतुकाची थाप टाकली. कोणत्याही क्षेत्रात यश मिळाले, किंवा नव्या क्षेत्रात पाउल टाकले तर राउत सर जवळ बोलवून घेउन पाठीवर कौतुकाची थाप टाकत. त्यांच्या एक्झिटमुळे सरांच्या कौतुकाच्या थापेला आता मी मिस करेल ! स्व. ठ. ल. राऊत, आमच्या शाळेचे प्राचार्य, माझे मार्गदर्शक गुरूवर्य. सरांनी संत निळोबाराय विद्यालयात त्यांनी २२ वर्षे सेवा केली. या २२ वर्षांमध्ये सर राळेगणसिध्दी परिवाराशी इतके एकरूप झाले की, सेवानिवृत्तीनंतर त्यांनी राळेगणसिध्दी हाच आपला परिवार माणून सेवानिवृत्तीचे जीवन इथेच व्यथीत केले. सेवा निवृत्तीनंतर सरांचे शाळेकडेही लक्ष असे. अण्णांच्या मार्गदर्शनाखाली हिंद स्वराज ट्रस्टचे विश्वस्त म्हणूनही त्यांनी अखेरच्या श्वासापर्यंत काम पाहिले.



सन १९८१ मध्ये म्हणजेच माझ्या जन्माच्या वेळी राऊत सर शाळेचे मुख्याध्यापक म्हणून रूजू झाले. तेंव्हापासून त्यांनी शाळा आणि अण्णांच्या मार्गदर्शनाखाली गावामध्ये सुरू असलेल्या विविध उपक्रमांसाठी त्यांनी वाहून घेतले. माझे वडील, मी आणि आता माझी मुले अशा तीन पिढयांना ते नावानिशी ओळखत. यावरून सरांचे आणि राळेगणसिध्दी परिवाराशी त्यांचे नाते किती घट्ट होते याची कल्पना येऊ शकेल.

अण्णांच्या मार्गदर्शनाखालील संत निळोबाराय विद्यालय तसे राज्यात नावलौकीक मिळविलेले विद्यालय. अण्णांच्या स्वप्नातील नापासांच्या शाळेमुळे हे विद्यालय खरे नावारूपास आले. नापासांच्या शाळेची संकल्पना अण्णांनी मांडल्यानंतर या शाळेमध्ये राऊत सरांनी कायद्याच्या चौकटीत राहून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले. नापास विद्यार्थ्यांसाठी, उनाड विद्यार्थ्यांसाठी शाळा असावी हे अण्णांचे स्वप्न राउत सरांनी अथक परिश्रम घेउन सत्यात उतरविले. या शाळेत अनेक विद्यार्थी दाखल होत. प्रत्येक विद्यार्थी समान नसतो हे ओळखून त्यांनी या विद्यार्थ्यांना शिक्षण दिले. नापासांच्या शाळेमध्ये शिकलेले अनेक विद्यार्थी आज उच्चपदस्थ आहेत. त्याचे श्रेय सर्वस्वी राऊत सरांनाच द्यावे लागेल.

राऊत सरांनी प्रत्येक विद्यार्थ्याची बुध्दीमत्ता, त्याची शारीरीक क्षमता ओळखून शिक्षण देण्याचा प्रयोग राबविला. त्या काळात प्रामुख्याने शेतकरी वर्गातील विद्यार्थी असल्याने आर्थिक परिस्थितीमुळे बुध्दीमत्ता असूनही इंजिनिअरिंग, मेडीकल या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेता येत नसे. त्यामुळे सरांनी बुध्दीमत्ता असलेल्या विद्यार्थ्यांकडे लक्ष देऊन भविष्यात ते शिक्षक होऊन स्वतःच्या पायावर उभे राहतील याची काळजी घेतली. तर शारीरीक दृष्टया सुदृढ विद्यार्थ्यांना शारीरीक शिक्षणाच्या माध्यमातून यार करण्यावर भर दिला. त्यामुळे अनेक विद्यार्थी लष्कर, तसेच पोलीस दलामध्ये भरती झाले. त्यासाठी गावामधील निवृत्त लष्करी जवानांचा त्यांनी शारीरीक शिक्षण देण्यासाठी उपयोग करून घेतला. स्वतःसह विद्यार्थ्यांच्या शारीरीक तंदुरूस्तीसाठी राऊत सर हे नेहमीच आग्रही असत. पहाटे पाच वाजताच ते विद्यार्थ्यांसोबत व्यायामासाठी न चुकता हजर असत.

## सरांनी शाळेचा लौकीक राज्यात पोहचविला

शारीरीक शिक्षण, मुल्य शिक्षण देणारी शाळा असा खेडेगावात असलेल्या या शाळेचा राज्यात नावलौकीक राऊत सरांनी केला. खेळांकडे त्यांचे विशेष लक्ष असे. त्यासाठी स्वतंत्र शिक्षकाची त्यांनी नियुक्ती केली. १९९० नंतर या विद्यालयाचे अनेक विद्यार्थी डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षण, उद्योग क्षेत्रात चमकले. त्यामागे राउत सरांचे परिश्रम होते हे नाकारता येणार नाही.

## सर प्रत्येकाला जवळचे वाटत

सन १९८१ पासूनच्या शाळेच्या विद्यार्थ्यांना राऊत सर नावानिशी ओळखत. इतके ते विद्यार्थ्यांशी जोडले गेले होते. वसतीगृहातील विद्यार्थ्यांचे नावे, त्यांचे गाव याचीही त्यांच्याकडे माहीती असे. त्यामुळे राउत सर हे प्रत्येकाला जवळचे वाटत.

## अण्णांचे उजवे हात

राऊत सर हे सतत अण्णांच्या सानिध्यात असत. अण्णांच्या कामाचा व्याप देशपातळीवर वाढल्यानंतर राऊत सरांनी अण्णांच्या संस्थांचे काम चोखपणे पाहिले. अण्णांचा उजवा हात म्हणून राऊत सर आपली भूमिका निभावत. त्यांच्या निधनामुळे अण्णांना राऊत सरांची उणीव निश्चित भासेल.

## सरांचे उपक्रम शासन स्तरावर स्विकारले गेले

शाळेत असो वा गावामध्ये सरांविषयी प्रत्येकाला आदरयुक्त भिती असे. सरांनी शाळेमध्ये अनेक प्रयोग राबविले. मुल्य शिक्षण, कार्यानुभव, शारीरीक शिक्षण, शारीरीक शिक्षणासाठी गुण हे आदर्श उपक्रम शिक्षण क्षेत्रातील तज्ञांनी उचलून धरले. हेच उपक्रम राज्य शासनाने शासन स्तरावर स्विकारले हाच राऊत सरांचा आदर्श होता.

## सरांनी मुख्याध्यापकपद उंचीवर नेले

संत निळोबाराय विद्यालयाचे मुख्याध्यापक म्हणून काम करताना पहाटे पाच ते रात्री ११ वाजेपर्यंत त्यांचा दिनक्रम ठरलेला असे. त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी मुख्याध्यापकपद उंचीवर नेऊन ठेवले. त्यांच्या निवृत्तीनंतर त्या पदावर बसलेल्या मुख्याध्यापकांना त्या पदाची गरीमा राखण्यासाठी अपार कष्ट घ्यावे लागले.

## सरांनी सामाजिक भान जपले

सन १९८१ मध्ये राळेगणसिध्दीत आलेल्या राऊत सरांनी आपले सामाजिक भान कायम जपले. एखादा शिक्षक शिकवत असतो तोपर्यंत समाज त्यास स्विकारतो. सरांच्या सेवानिवृत्तीनंतर मात्र राळेगणसिध्दी परिवाराकडून त्यांना तोच मान, सन्मान दिला. नोकरीचे २२ वर्षे व सेवानिवृत्तीनंतरचे २२ वर्षे असे ४४ वर्षे राऊत सर हे राळेगणसिध्दी परिवाराचे अविभाज्य घटक होते. असा आदर क्वचितच पहावयास मिळतो.

## सरांचे विज्ञानवादी जीवन

विज्ञानाचे शिक्षक असलेले राऊत सर हे कर्मकांडाच्या विरोधात होते. त्यांचे विचार विज्ञानवादी होते. मात्र त्यांनी त्यांचे विज्ञानवादी विचार कधीही कोणावर लादले नाहीत. ते स्वतः विज्ञानवादी जीवन जगले. शाळेमध्ये कार्यरत असताना शाळेबाहेरचा विचार त्यांनी कधीही केला नाही त्यामुळेच ही शाळा राज्यात नावारूपास आली.

## सुखद मृत्यू

मृत्यू हा वाईटच. मात्र राऊत सरांना सुखद मृत्यू आला. -हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. त्यांना कधीही दवाखान्यात जाऊन उपचार घ्यावेसे वाटले नाहीत. कोणत्याही व्याधीशिवाय सरांनी वयाच्या ८१ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला.

■ **सुरेश राजाराम पठारे**
मा. विद्यार्थी, संत निळोबाराय विद्यालय, राळेगणसिध्दी
उद्योजक, कन्हैय्या अॅग्रो,गटेवाडी, ता. पारनेर

---

### कै. ठकाराम राऊत (सर)

## अण्णांच्या स्वप्नातील नापासांच्या शाळेचे शिल्पकार!




**बलशाली भारत होवो** विश्वात शोभुनी राहो ! या काव्यपंक्तीनुसार विद्यार्थ्यांप्रती असलेला भाव प्रकट करताना भावना उचंबळून येतात श्री. संत निळोबाराय विद्यालयाचे माजी प्राचार्य ठकाराम लक्ष्मण राऊत एक अष्टपैलू व्यक्तिमत्व आपल्यातून हरपले मनाला खूप दुःख होत आहे ,परंतु ईश्वरी सत्ते पुढे इलाज नाही सरांच्याबद्दल खूप काही बोलण्यासारखं आहे, आदरणीय राऊत सरांनी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी अभ्यासाबरोबरच सहशालेय उपक्रमांना अधिक प्राधान्य देऊन विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य घडवून आणण्याचे कार्य आदरणीय सरांनी केलं

आपल्या देशाचे भूषण सर्वांचे श्रद्धास्थान पद्मभूषण अण्णासाहेब हजारे यांच्या स्वप्नातील नापासांची शाळा प्रत्यक्षात साकारण्याचे काम सरांच्या माध्यमातून झाले आहे .अण्णा नेहमी म्हणायचे हुशार विद्यार्थ्यांना प्रवेश चांगल्या शाळेत मिळेल, परंतु अभ्यासात कमी असणाऱ्या, तसेच आई वडिलांना त्रास देणाऱ्या मित्रांच्या संगतीमुळे बिघडलेल्या विद्यार्थ्यांच्यावर संस्कार करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य म्हणजे विद्यार्थी घडवणे अशा या सचोटीला प्रत्यक्षात उतरवण्याचे कार्य आदरणीय राऊत सरांनी आपल्या कल्पकतेच्या आणि बुद्धी कौशल्या वरती सत्यात उतरवण्याचे कार्य खऱ्या अर्थाने केले. त्या माध्यमातून अनेक विद्यार्थी घडले आजही हजारो विद्यार्थी म्हणतात की राळेगणसिद्धीला जर प्रवेश घेतला नसता तर कदाचित आम्ही माणूस म्हणून घडलो नसतो.

विद्यार्थी घडवण्याचं कार्य केले आहे मंदिरातील देव म्हणजे माझा विद्यार्थी हे सुतोवाच सर नेहमी म्हणायचे घड्याळाकडे न पाहता अविरत विद्यार्थ्यांसाठी काम करत असणारी ही शाळा सरांच्या मार्गदर्शनाखाली नावारूपाला आली त्यातून विद्यार्थ्यांच्या वर श्रमसंस्कार शिस्त वक्तशीरपणा राष्ट्रभक्ती असे संस्कार घडवण्याचे कार्य सरांनी केलं सर नेहमी प्रसिद्धी माध्यमातून दूर राहायचे उत्तम प्रशासक म्हणून कार्य सिद्धीस नेले अशा या प्रेमळ स्वभावाचा माणूस आपल्यातून निघून गेल्याचं खूप दुःख होत आहे.

त्यांच्या पाठीमागे त्यांच्या धर्म पत्नी विमल राऊत मुलगा विवेक मुलगी वैशालीताई सून शितल नातू विराज आणि रोहन आणि नात डॉक्टर सायली तसेच त्यांचे सर्व नातेवाईक आप्तेष्ट यांना जे दुःख झालेले आहे या दुःखातून या सर्व कुटुंबीयांना सावरण्याची शक्ती सामर्थ्य परमेश्वराने द्यावी अशी प्रार्थना करून आदरणीय सरांना आमच्या धावडे परिवाराकडून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित करतो राम कृष्ण हरी

■ **भाऊसाहेब धावडे सर**
सेवानिवृत्त प्राचार्य






# ''माझ्या अतिप्रिय बाळ गोपाळांनो'' .... ते ''आता उरलो आशीर्वादापुरता..!''

**१०जून शाळेचा पहिला दिवस...** त्यामुळे सकाळी लवकर उठलो ,नेहमीच्या सवयीप्रमाणे सोशल मीडिया ओपन करून व्हाट्सअप पाहत असताना ''भावपूर्ण श्रद्धांजली'' असं दिसलं बघतो तर आदरणीय राऊत सर रात्रीच इहलोकीची यात्रा संपून परलोकी गेले होते. थोडा वेळ मन सुन्न झालं.पहिला विचार मनात आला तो म्हणजे ''द्राक्षाचा वेलू लिंबावरी गेला कडू का झाला संगतीमुळे .''कधीतरी सातवी आठवीत असताना शनिवार सकाळच्या चिंतनामध्ये श्री संत निळोबाराय विद्यालयामध्ये आदरणीय गुरुवर्य कै. राऊत सर यांच्या तोंडून ऐकलेला तुकोबारायांचा अभंग मनात तरुण गेला, असे अनेक अभंग शनिवारच्या चिंतनामध्ये राऊत सर घेऊन उदाहरणासह गोष्टी रूपाने विद्यार्थी मनाला भावेल असे त्याचे निरूपण करायचे. आणि या अभंगांनी हजारो विद्यार्थ्यांचे आयुष्य घडविले, वाईट संगत, वाईट व्यसनांपासून दूर ठेवले त्यापैकी मी (जे.डी.मापारी)एक सरांचा एस.एस. सी,१९९७ व एच.एस.सी.१९९९ बॅचचा शिष्य...

आज १० जून शाळेचा पहिलाच दिवस होता. मनात आले आज श्रद्धांजली स्वरूप शाळेला सुट्टी द्यावी का? पण नंतर मनात विचार आला की ज्या सरांनी शिक्षणासाठी विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी आयुष्य कामी पाडले , त्या गुरुवर्यांसाठी शाळा सुरू ठेवून श्रद्धांजली देणे हे संयुक्तिक ठरेल म्हणून सरांच्या निधनाची बातमी समजूनही डीबीएम स्कूल सुरू ठेवले.
'' Show must go on'' हा ही सरांच्या संस्काराचा एक भाग आहे. कितीही संकटे आली तरी डगमगून न जाता त्यांना सामोरे जाण्याचे बळ सरांच्या शिकवणीतून मिळाले.

आदरणीय अण्णांच्या संकल्पनेतील नापासांची शाळा प्रत्यक्षात साकार करून संपूर्ण देशाभरात नावारूपाला आणण्यात सरांचा सिंहाचा वाटा....आपल्या सर्व सहकाऱ्यांवर बंधुतुल्य प्रेम करून, प्रशासनावर मजबूत पकड स्थापित करून, सर्वांना विश्वासात घेत सरांनी आपल्या कार्य-कालात हजारो उनाड, नापास, व्यसनी विद्यार्थ्यांना जगण्याची नवी उमेद ,प्रेरणा देऊन समाजात मानाचे स्थान मिळवून दिले. त्याचीच परिनिती म्हणून शेकडो विद्यार्थी शिक्षक,झाले शेकडो विद्यार्थी आर्मीमध्ये भरती झाले, कित्येक डॉक्टर ,इंजिनियर , व्यावसायिक, प्रगतशील शेतकरी झाले आणि आपापल्या आयुष्यात संस्काराची शिदोरी घेऊन जाऊन ती आयुष्यभरासाठी वापरत आहेत हे राऊत सरांच्या दूरदृष्टीचे फलीत आहे.

सरांनी शालेय जीवनात विद्यार्थ्यांच्या मनावर चांगले संस्कार रुजावेत यासाठी अनेक उपक्रमांचे अगदी पद्धतशीरपणे आयोजन केलेले होते.राळेगण सिद्धी मध्ये श्रमदानातून अनेक कामे उभी राहिली त्यामध्ये श्री संत निळोबाराय विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या श्रमदानाचा देखील मोठा वाटा आहे. राळेगणसिद्धी परिसरातील वेगवेगळ्या डोंगरांवर वृक्षारोपण करणे, वृक्ष संवर्धन करणे,गावची व शाळेची सफाई करणे इतकेच नव्हे तर शाळेच्या इमारतीच्या पायाभरणीपासून तर पूर्णत्वाला जाईपर्यंत विद्यार्थ्यांनी श्रमदानातून आपले योगदान दिले. विद्यार्थ्यांवर श्रमसंस्कार रुजवण्याचे काम राऊत सरांच्या कार्यकाळात त्यांच्या सर्व सहकाऱ्यांच्या मदतीने झाले. हेच श्रमसंस्कार पुढे प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यात कामी आले स्वावलंबी शिक्षण हे प्रत्येकाला कळत गेले. पुढे आयुष्यात जे- जे विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रात गेले तेथे कुणालाही श्रम, कष्ट करण्याची कधीच लाज वाटली नाही. श्रमसंस्कारांची ही शिदोरी आजही विद्यार्थी चाखत आहेत.

''शरीर माध्यम खलु धर्म साधनम ! याप्रमाणे विद्यार्थी हा आरोग्य संपन्न असावा यासाठी सरांनी बलसंवर्धनावर विशेष लक्ष केंद्रित केले होते. सकाळी साडेपाच वाजता हॉस्टेलच्या विद्यार्थ्यांसोबत गावातीलही विद्यार्थी मैदानावर हजर असावेत असा सरांचा दंडक असे व या विद्यार्थ्यांची पहाटे हजेरी घेऊन सकाळी प्रार्थनेच्या वेळी त्या विद्यार्थ्यांचा मागोवा घेतला जाई, पुन्हा संध्याकाळी साडेपाच ते सात वाजेपर्यंत वेगवेगळ्या खेळांच्या प्रॅक्टिस चालत यामध्ये स्वतः सर ग्राउंड वर उभे राहून पाहत असत. त्यावेळी मैदान हे सकाळी व संध्याकाळी पूर्ण गजबजलेले असायचे. तालमीमध्ये विद्यार्थी असायचे. याचा परिणाम म्हणून अनेक आरोग्य संपन्न पिढ्या तयार तर झाल्याच परंतु त्यातील अनेक विद्यार्थी हे क्रीडा क्षेत्रात नावाजले, पोलीस ,आर्मी ,सशस्त्र बल अशा ठिकाणी सहज भरती झाले. खऱ्या अर्थाने सर विद्यार्थ्यांमध्ये बलसंस्कार रुजवण्यात यशस्वी झाले ही उर्मी आज तागायत टिकून होती.
(आत्ताच काही दिवसांपूर्वी राऊत सर (माऊली मापारी मेजर निवृत्त सैनिक) यांस म्हणाले होते की आपण तालमीमध्ये तूप ,हळद ,माती यासाठी अण्णांना भेटूया.... पण ही भेट आधुरीच राहिली....

प्रज्ञा विकास काय असतो हे राऊत सरांकडून शिकलो.
सरांचा तसा मूळ विषय विज्ञान परंतु सरांनी अध्यात्म व विज्ञान यांची अतिशय उत्कृष्ट अशी सांगड घातली होती कोणत्याही वर्गात गेल्यानंतर राऊत सर विद्यार्थ्यांना विचारायचे की तुम्हाला कोणता विषय अवघड जातो? आणि विद्यार्थी जो विषय सांगतील तो विषय शिकवायला सुरुवात करायचे अशा प्रत्येक विषयावर सरांची मजबूत पकड होती .१९९८-९९ साली बारावीला असताना नवीनच वर्ग सुरू झाल्याने इंग्रजीचे शिक्षक नव्हते .त्यावेळी सरांनी आम्हाला इंग्रजी विषय अतिशय सोपा करून शिकवल्याचे आजही आठवणीत आहे.

जसे बलसंवर्धन तशाच प्रकारे शील संवर्धन... सरांच्या मूर्तीवंत प्रेरणेने श्री संत निळोबाराय विद्यालयातून अनेक शिक्षकही घडले, जे राऊत सरांचे वेगवेगळे संस्कार आपल्या स्वतःत रुजवून आजही आपापल्या विद्यार्थ्यांमध्ये ,समाजात खऱ्या अर्थाने संस्कार पेरत आहेत असे अनेक शिक्षक घडले... त्यातील मीही एक सरांचा आजन्म विद्यार्थी...डीबीएम इंग्लिश मीडियम स्कूलच्या माध्यमातून पंचक्रोशीतील शेकडो विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत संस्कार देण्याचे काम करत आहे. याचे सर्व श्रेय पद्मभूषण डॉक्टर अण्णासाहेब हजारे व गुरुवर्य आदरणीय कै.राऊत सर यांचेच आहे.

२००८ मध्ये शैक्षणिक कार्य करणारी संस्था म्हणून जेव्हा संस्थेला नाव द्यायचे ठरले त्यावर खूप विचार करून संस्कार प्रतिष्ठानअसे नाव दिले त्यावेळी देखील सरांनी सांगितले होते की शाळा कोणत्याही माध्यमाची असो परंतु विद्यार्थ्यांना संस्कार हे मिळालेच पाहिजे संस्कारक्षम शिक्षण हेच खरे शिक्षण आणि सरांच्या या वाक्यातील प्रेरणेने आजही आम्ही मार्गक्रमण करत आहोत सरांनी दाखवलेल्या या पायवाटेवरून चालत आहोत.श्री संत निळोबाराय विद्यालयात नापास विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याने त्यांची अगदी मुळापासून तयारी करून घेण्यासाठी सरांनी म्हणजेच आमच्या त्या वेळेच्या विद्यार्थी भाषेत ''दारिद्र्यरेषेखालील तास'' सकाळी ८ ते ९.३०असे विशेष वर्ग सरांच्या संकल्पनेतून भरवले गेले की ,ज्या वर्गामधून विद्यार्थ्यांना पूर्णतः पायाभूत शिक्षण दिले गेले. व त्या विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात सामावण्याचे काम घडले. आजही असे शेकडो विद्यार्थी आहेत की जे स्वतः सांगतात, ''आम्ही जर राळेगणच्या शाळेमध्ये शिकलो नसतो तर आयुष्यामध्ये पूर्ण




वाया गेलो असतो.'' हा एवढा मोठा समाज घडवण्याचं काम आदरणीय राऊत सरांच्या मार्गदर्शनातून होत गेले. पुढे शिक्षक झाल्यानंतर काही वर्ष असे तास घेण्याचे योग माझ्याही वाट्याला आले हे माझे परम भाग्यच..

तसेच रात्रीच्या अभ्यासिकेबद्दल ...पूर्वी गावामध्ये सर्वांच्या घरी लाईट नसल्यामुळे रात्री ८ ते ९.३० पर्यंत रात्र अभ्यासिका चाले .नाईट स्टडी हा देखील सरांनी राबवलेला एक अनोखा उपक्रम यामध्ये विद्यार्थी शाळेत येऊन वर्गामध्ये बसून अभ्यास करायचे,काही शंका असतील तर शिक्षकांना विचारायचे यामधून स्वयं- अध्ययनाची सवय मुलांना लागली. पहाटे ५.३० वाजता सुरू झालेला दिवस रात्री ९.३० वाजता या अभ्यासिकेने संपायचा.

राळेगण सिद्धी कर्मभूमी मानून राऊत सर आपल्या कुटुंबाचा, घरादाराचा, गावाचा त्याग करून राळेगणसिद्धी येथेच स्थायिक झाले. व राळेगणसिद्धी परिवाराचे एक कुटुंबप्रमुख झाले. निवृत्तीनंतरही राळेगण सिद्धी मध्येच सरांनी वास्तव्य चालू ठेवले. आदरणीय अण्णांसोबत तन ,मन,धनाने आपली सेवा सुरूच ठेवली. हिंद स्वराज्य ट्रस्टच्या माध्यमातून जगभरातून येणाऱ्या लोकांना राऊत सरांनी वेगवेगळ्या ट्रेनिंगच्या माध्यमातून आदरणीय अण्णांबद्दल, गावातील विविध उपक्रमाबद्दल, नापासांच्या शाळेबद्दल, होस्टेल बद्दल व्याख्यान देतच राहिले. आजन्म ते शिक्षकच राहिले...

निवृत्तीनंतर माजी विद्यार्थी त्यांना आपल्या वेगवेगळ्या कार्यक्रमात निमंत्रित करत असत. त्यावेळी सरांना भाषण करायला आवर्जून सांगितले जाई. पण राऊत सर परिस्थितीचे व समोरील श्रोता वर्गाचे भान ठेवून नेहमीच मोजक्या शब्दात भाषण करत व भरभरून आशीर्वाद देत.माजी विद्यार्थ्यांच्या लग्नात व पुढे त्यांच्या मुला-मुलींच्या लग्नात शुभाशीर्वाद देताना राऊत सर अगदी मोजक्या शब्दात शुभाशीर्वाद देत व आवर्जून कन्यादान करणाऱ्या मातेला वंदन करत.हेच सरांचं वेगळेपण होतं. संपूर्ण शुभकार्यात कन्यादान करणारी माता ही श्रेष्ठ आहे पण कदाचित तेवढीच दुर्लक्षित आणि ह्याच भान ठेवून राऊत सर त्या मातेचाही उल्लेख करून वंदन करत असत, की जे इतर कोणी आजही करत नाहीत.

गेल्या वर्षी १६ ऑगस्ट २०२३ रोजी श्री संत निळोबाराय विद्यालय मध्ये विद्यालयाच्या स्थापनेपासून तर २०२३ पर्यंतच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा पार पडला. या कार्यक्रमात प्रत्येक बॅचचे विद्यार्थी पाच, दहा, पंधरा, वीस, पंचवीस ,तीस, चाळीस वर्षानंतर भेटणारे होते. हजारो विद्यार्थी एवढ्या वर्षानंतर एकत्र भेटल्यामुळे आपापसात कुजबुजत होते, पुढे कार्यक्रम लांबत होता आणि सर्वांना शांत करणे कठीण होऊन गेले अशा वेळी राऊत सर भाषणाला उभे राहिले व फक्त ''माझ्या अतिप्रिय बाळगोपाळांनो''.... या वाक्याने पूर्ण मैदान अगदी शांत झाले. हे मायेचे शब्द सर्वांनी अनेक वर्षांतून ऐकले होते सगळे विद्यार्थी भावुक झाले होते. आता पुन्हा ते शब्द आम्हाला मायेची साद घालणार नाहीत..... याच कार्यक्रमात सरांनी आम्हा सर्व विद्यार्थ्यांना भरभरून आशीर्वाद दिले आणि पुन्हा संत तुकारामांच्या अभंगातच आता उरलो उपकारापुरता असे सांगताना ''आता उरलो आशीर्वादापुरता'' असा उल्लेख सरांनी केला होता.

सर तुमचा आशीर्वाद आमच्यासाठी खूप मोलाचा आहे, कदाचित देवांनाही या आशीर्वादाची गरज पडली असावी म्हणूनच आपणाला बोलावले असेल.जेव्हा जेव्हा सरांना भेटायचो तेव्हा सर अगदी मायेने जवळ घ्यायचे,डोक यावरून,तोंडावरून,पाठीवरून हात फिरवायचे अगदी प्रेमाने चौकशी करायचे. अगदी भरभरून आशीर्वाद द्यायचे या सर्व गोष्टींना आम्ही सर्व बाळ-गोपाळ आता मुकणार.....

गेल्या १७ वर्षांपासून डी बी एम स्कूलच्या माध्यमातून मी व माझी पत्नी सौ शीतल पूर्ण वेळ शिक्षण कार्यात व्यस्त असल्याने व राऊत सरांनी आमचा हा शिक्षण प्रवास जवळून पाहिला असल्याने सरांनी एक दोन वेळा आमचा उल्लेख ज्योती - सावित्री असा केला. (अर्थात आम्ही एवढ्या महान पात्रतेचे नक्कीच नाहीत.) परंतु हा एक सरांचा आमच्यासाठी शब्द गौरव/ आशीर्वाद म्हणावा लागेल.सर आम्ही तुमचे सर्व शिष्य वचन देतो की ''उतणार नाही,मातणार नाही ,घेतला वसा टाकणार नाही.'' तुम्ही दिलेल्या संस्काराच्या शिदोरीचा नेहमी चांगल्या कार्यासाठीच उपयोग करू.
सरांच्या हजारो अतिप्रिय बालगोपाळांपैकी एक गोपाळ होण्याचा योग आयुष्यात आला आणि सरांचे भरभरून आशीर्वाद मिळाले यातच भरून पावलो. सर आपणच म्हटल्याप्रमाणे ''आता उरलो आशीर्वादापुरता...''
आपले आशीर्वाद आम्हा बाळगोपाळांसोबत नेहमी आहेतच.....
सर तुम्ही आमच्यातच आहात...कारण एका शिक्षकाचे आयुष्य किती असं म्हटल्यावर उत्तर येतं =(तुमचे हजारो विद्यार्थी ते विद्यार्थी जेवढे वर्ष जगतील तेवढी वर्षे.)
**आपलाच एक प्रिय बाळगोपाळ**

■ जे. डी.मापारी,
संस्थापक अध्यक्ष,(संस्कार प्रतिष्ठान)
डी.बी.एम. इंग्लिश मीडियम स्कूल, राळेगणसिद्धी.

## शॉर्ट न्यूज

### वडाळ्यात कृषीकन्यांचे स्वागत

■ **वडाळा :** नेवासा तालुक्यातील वडाळा बहिरोबा येथे सोनई कृषी महाविद्यालयाच्या कृषीकन्यांचे स्वागत करण्यात आले. ग्रामीण कृषी जागृती कार्यक्रम अंतर्गत या कृषीकन्या दहा आठवडे वडाळा बहिरोबा गावामध्ये शेतीविषयक विविध कार्यक्रम राबविणार असून शेतकऱ्यांचे अनुभव तसेच आधुनिक शेतीविषयक मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी प्रगती ढमढेरे, स्नेहा कांबळे, प्रणाली माळी, भारती लंघे, वैष्णवी आगळे या कृषीकन्यांचे ग्रामस्थांनी स्वागत केले. कार्यक्रम समन्वयक डॉ. अतुल दरंदले, कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक आर. टी. दिघे यांचे मार्गदर्शन लाभले.

### दुष्काळी अनुदान जमा करण्याची मागणी

■ **शेवगाव :** तालुक्यातील शेतकऱ्यांच्या खात्यावर दुष्काळी अनुदान जमा करावे, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय फुंदे यांनी केली आहे. याबाबत महसूलमंत्री व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना देण्यात आले. याबाबत तातडीने निर्णय घेऊन शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये दुष्काळी अनुदान जमा करावे. याबाबत तातडीने उपाययोजना न झाल्यास दि. २५ जूनपासून गावोगावी साखळी उपोषण करण्याचा इशारा फुंदे यांनी दिला आहे.

### आंबित तलाव झाला ओव्हरफ्लो

■ **अकोले :** हरिश्चंद्रगडाच्या पर्वत रांगांत मान्सून सक्रिय होऊ लागला आहे. मुळा खोऱ्यातील आंबित येथील लघु पाटबंधारे तलाव पूर्ण क्षमतेने भरला. दरम्यान, मागील चार दिवसांपासून हरिश्चंद्रगड परिसरात पावसाचा जोर वाढत नसला तरी पडत असलेल्या पावसाच्या सरींमुळे हरिश्चंद्रगडाच्या पायथ्याशी मुळा नदीवर असलेले १९३ दशलक्ष घनफूट क्षमतेचे आंबित धरण भरून वाहू लागल्याची माहिती शाखा अभियंता अभिजित देशमुख यांनी दिली.

### ज्ञानेश्वर मंदिर मठाधिपती म्हस्के महाराज

■ **नेवासा :** येथील ज्ञानेश्वर मंदिराचे सेवेकरी महाराज म्हणून देविदास महाराज म्हस्के यांची निवड करण्यात आली. श्रीक्षेत्र देवगडचे महंत भास्करगिरी महाराज यांच्या अध्यक्षतेखाली पदग्रहण करणार आहेत. यापूर्वी या पदावर शिवाजी महाराज देशमुख काम पाहत होते. देविदास महाराज म्हस्के हे सध्या श्रीक्षेत्र हिंगणगाव (ता. शेवगाव) येथील अडबंगीनाथ संस्थान येथे कार्यरत असून सद्गुरु जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था आळंदीचे माजी विद्यार्थी आहेत. अशी माहिती माहिती देवस्थानच्यावतीने देण्यात आली.

### सोनवणे यांची एमएससाठी निवड

■ **श्रीरामपूर :** तालुक्यातील टिळकनगर येथील डहाणूकर इंग्लिश मेडियम स्कूलच्या माजी विद्यार्थी पार्थ राहुल सोनवणे यांची एमएस अभ्यासासाठी अमेरिकेतील नॉर्थ इस्ट युनिव्हर्सिटी बोस्टर्न येथे नुकतीच निवड झाली आहे. राहुल सोनवणे यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण डहाणूकर इंग्लिश मेडियम स्कूल टिळकनगर येथे झाले.

SACCHIDANAND CAREER INSTITUTE
Parner Public School
G.M INTERNATIONAL SCHOOL PARNER
ADMISSIONS
OPEN 2024-25
प्रवेश सुरू
२०२४-२५
PARNER PUBLIC SCHOOL
LKG, UKG, STD 1st
State Board
11th Science (State Board & NCERT Syllabus)
Integrated with NEET & MHT-CET
MHT-CET (Engg., NATA, Architecture, NDA, Other Entrance)
NEET (Medical, Agri, Pharmacy, Other Entrance)
G. M. INTERNATIONAL SCHOOL
LKG, UKG, STD 1st to 5th
CBSE Board

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2



डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
- अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच



मेजर भगवान नांगरे सर
* आमची वैशिष्ट्ये *
* १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
* एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
* प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
* मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
* अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
* PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
* पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
* ॲडमिशन ओपन *
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com

# राळेगणसिद्धी परिवाराचे आचार्य गेले...



**दोन हजारच्या दशकात** राळेगणसिद्धी येथील माध्यमिक विद्यालय हे नापासांची शाळा म्हणून महाराष्ट्रभर प्रसिद्ध झाले होते. याचे कारणही तसेच अनोखे होते. गुणवत्तेऐवजी नापास झालेल्या, उनाडपणा करणार्या, व्यसनाधीन व शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर फेकल्या गेलेल्या मुलांना या शाळेत प्राधान्याने प्रवेश देण्यात येत होता. हा एक आगळावेगळा व अतिशय धाडशी प्रयोग होता. पण ध्येयवाद आणि अथक परिश्रमातून तो कमालीचा यशस्वी झाला. ही किमया करणारे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणजे ठकाराम राऊत सर. ते संपूर्ण राळेगणसिद्धी परिवाराचे आचार्य होते. त्यांचे राळेगणसिद्धी येथे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता ऐकून पंचक्रोशीतील ग्रामस्थांसह राज्यभरातील हजारो माजी विद्यार्थी हळहळले.

कर्जत तालुक्यातील डाकू निमगाव हे राऊत सरांचे मूळ गाव. एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्म. घरी कमालीची गरिबी. तरीही त्या प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करून त्यांनी एम.एस्सी.बी.एड. पर्यंतचे शिक्षण घेतले. काही दिवस कर्जत तालुक्यातच माध्यमिक शिक्षक म्हणून नोकरी केली.

दरम्यान, राळेगणसिद्धी हे आदर्श गाव म्हणून नुकतेच उदयाला आले होते. १९८० मध्ये ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, सदाशिव मापारी व इतर सहकार्यांनी गावात माध्यमिक शाळा सुरू केली. त्यावेळी मुलाखतीद्वारे कै. राऊत सर यांची या शाळेच्या मुख्याध्यापक पदावर नियुक्ती करण्यात आली. त्या निमित्ताने त्यांचे राळेगणसिद्धी येथे पदार्पण झाले. येथील ग्रामविकासाचे कार्य पाहून राऊत सर एवढे भारावून गेले की त्यांनी राळेगणसिद्धी परिवारासाठी कायमचे वाहून घेतले. पदाने ते मुख्याध्यापक असले तरी त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वामुळे ते सर्वांना एखाद्या गुरुकुलाचे आचार्य वाटायचे. ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांमध्ये त्यांच्याविषयी तसाच आदर होता. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी विविध अभिनव प्रयोग यशस्वीपणे राबवले. पहाटेच्या व्यायामापासून तर रात्रीच्या अभ्यासिकेपर्यंत ते अखंड विद्यार्थ्यांच्या सोबतच असायचे. त्यांनी विद्यालयात बल संवर्धन, शील संवर्धन, देशप्रेम, श्रमसंस्कार आणि प्रज्ञा विकास ही पंचसूत्री राबवली. त्यातून हजारो विद्यार्थ्यांचे जीवन घडले. बल संवर्धनाला प्राधान्य दिल्यामुळे त्यातून तिनशेहून अधिक विद्यार्थी भारतीय सेनेत भरती झाले. अनेक खेळाडू राष्ट्रीय स्तरावर चमकले. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा, कला, संगीत व मूल्य शिक्षण असे विविध पैलू रुजवले.

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी मांडलेल्या नापासांची शाळा या संकल्पनेला राऊत सरांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने मूर्त स्वरूप दिले. गुणवत्तेवर आधारीत प्रवेश तर सगळ्यात शाळा देतात. पण नापास झालेल्या मुलांना प्राधान्याने प्रवेश देण्याचा धाडशी प्रयोग राळेगणसिद्धीने केला. त्याचप्रमाणे उनाड, व्यसनाधीन होऊन वाया गेलेल्या शेकडो विद्यार्थ्यांचे जीवन या प्रयोगातून बदलून गेले असल्याची अनेक उदाहरणे आहेत.

विद्यालयाच्या माध्यमातून राळेगणसिद्धी गावात राबविण्यात येणाऱ्या प्रत्येक उपक्रमात राऊत सरांनी भरघोस योगदान दिले. वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन, श्रमदान, गावातील विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम यात त्यांचा मोलाचा सहभाग असायचा. विविध गुणनैपुण्याबरोबरच विद्यालयातील शैक्षणिक गुणवत्तेचा आलेखही सतत उंचावत राहिला. उच्च गुणवत्ता प्राप्त करून त्यांच्या अनेक विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात उंच भरारी घेतली आहे.

सर्व विद्यार्थ्यांवर जीवापाड प्रेम करताना त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देऊन त्यांचे तोंड भरून कौतुक करणे, त्यांना प्रेरणा देणे हे राऊत सरांचे विशेष गुणवैशिष्ट्य होते. विद्यालयात मुख्याध्यापक म्हणून २२ वर्षे अविरत सेवा केल्यानंतर ते २००२ साली सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्तीनंतर गावी जाण्याऐवजी किंवा शहरात जाऊन स्थायिक होण्याऐवजी त्यांनी राळेगणसिद्धी येथेच राहणे पसंत केले. गावाकडील वडिलोपार्जित जमीन आपल्या भावांना देऊन टाकली. अण्णा हजारे यांनी त्यांच्यावर हिंद स्वराज ट्रस्ट आणि स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी या दोन्ही संस्थांच्या संचालक पदाची जबाबदारी दिली. गेली २२ वर्षे त्यांनी अतिशय समर्पित भावनेने या दोन्ही संस्थांचे काम पाहिले. उच्चशिक्षित असूनही अतिशय साधी राहणी असलेल्या राऊत सरांना आजिबात अहंकार नव्हता. ते हजारे यांचे अतिशय विश्वासू सहकारी होते. तसेच शिक्षण संस्थेच्या विकासासाठीही त्यांनी आपल्या ज्ञानातून व अनुभवातून निरपेक्ष भावनेने काम केले.

कै. राऊत सरांचा परिवार त्यांच्या विचारांना साजेसा सात्विक परिवार आहे. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, मुलगी व नातवंडे असा परिवार आहे. मुलगा औरंगाबाद येथे औषधनिर्माण कंपनीत शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत आहे तर मुलगी प्राथमिक शिक्षिका आहे.

ग्रामस्थांसह हजारो माजी विद्यार्थ्यांचे आचार्य असलेले ठ. ल. राऊत हे अनंतात विलीन झाल्यामुळे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, संस्थेचे अध्यक्ष सदाशिव मापारी, शाळा समितीचे अध्यक्ष संपतराव पोटे, खजिनदार गंगाभाऊ मापारी, सर्व संचालक, सरपंच जयसिंगभाऊ मापारी, माजी सरपंच लाभेश औटी यांच्यासह ग्रामस्थ व अनेक माजी विद्यार्थ्यांनी दुःख व्यक्त केले आहे.

■ संजय पठाडे

# विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत राऊत सरांचा सिंहाचा वाटा



**शिक्षकाच्या आयुष्यात** भरपूर पैसा नसला तरी विद्यार्थी ही त्यांची दौलत असते हा विद्यार्थी माझा तो विद्यार्थी माझा हे सांगताना जो स्वर्गीय आनंद मिळतो तो अवर्णनीय असतो आणि तो सुख सोहळा कै.राऊत सरांनी आपल्या जीवनात नक्कीच अनुभवला !

सन्माननीय सरांचा आणि आमचा घरोबा गेली तीस वर्षांपासून ते आजतागायत सर ज्ञानदेव उगले मेजर यांच्या घरात राहत असताना शेजारी ते मुख्याध्यापक या नानाविध भुमिकांमधून सरांचे मार्गदर्शन,संस्कार अन प्रेम लाभले.माझ्या शिक्षकी पेशाच्या जडणघडणीत राऊत सरांचा सिंहाचा वाटा आहे शालेय जीवनात सतत मला माझ्यातील संभाषण कौशल्य हेरून मला तु शिक्षकच व्हाव हे सांगत असत गावी आलो कि सरांची भेट झाल्यावर पहिला गालावर हात फिरवणार,,पाठीवर थाप अन मग खुशाली,नैतिक मूल्यांची जोपासना खरी त्यांनी इयत्ता पाचवी पासून मुलांना रुजवली त्याचा फायदा म्हणजे श्रमसंस्कार, बलसंस्कार,शारीरिक सुदृढता या गुणांमुळे आजही आम्ही तंदुरुस्त आहोत

गत वर्षी १६(सोळा) ऑगष्ट रोजी विद्यालयात झालेल्या स्नेहमेळाव्याच्या गुरु जण सन्मान सोहळ्याच्या कार्यक्रमात पुर्वतयारी ते कार्यक्रम पार पडेपर्यंत सर स्वतः हून फोन वर संपर्क करत होते त्यांच्या सहकार्याने आणि कृपाशीर्वादाने कार्यक्रम यशस्वी झाला त्याच कार्यक्रमात सर बोलले होते.


**''ठका म्हणे उरलो उपकारापुरता''**

निस्वार्थ अन समाजप्रिय जिवन जगले सर,आर्थिक,सामाजिक,, वैचारिक स्वरूपात सरांनी आमच्या कुटुंबासाठी सतत मदतीचा हात पुढे केला

माझ्या कुटुंबातर्फे मुंबईतील सर्व शिक्षक सहकारी मित्रांच्या वतीने मुंबईच्या डब्बेवाल्या कष्टकरी मंडळीच्या वतीने आमच्या माजी विद्यार्थी दहावी सन १९९३च्या बँचच्या वतीने **सरांना भावपूर्ण श्रद्धांजली**

■ पोपट तुकाराम फटांगडे
शिक्षक मुंबई महानगरपालिका

# आदर्श विद्यार्थी घडविणारे विद्यापीठच हरपले



**स्व.प्राचार्य ''कर्मयोगी''** ठकाराम राऊत सर हे कर्जत तालुक्यातील निमगाव डाकू गावातील मूळ रहिवाशी होते. साधारण १९८१ मध्ये ते राळेगण सिद्धीत आले.२००२ साली ते प्राचार्य पदावरून निवृत्त झाले असले तरी ते शेवटपर्यंत हिंद स्वराज संस्थेमध्ये विश्वस्त होते. त्यांनी नापासांची शाळा आदर्श शाळा करण्यात आपले दिलेले योगदान आणि त्यातून आदर्श गाव होण्यासाठी मदत झाली तसेच त्यांनी आपले जीवन राळेगण परिवाराला आणि हिंद स्वराज संस्थेला समर्पित केले होते.

आदरणीय अण्णासाहेब हजारे यांच्या विश्वासाला पात्र असणार व्यक्तिमत्व म्हणजे राऊत सर. सरांनी संत यादवबाबा शिक्षण प्रसारक मंडळचे श्री संत निळोबाराय विदयालय राळेगण सिद्धीला आपले मंदिर मानले होते. पहाटे ५ वाजता गावातील आणि वसतिगृह च्या मुलांना रनींग पासून सुरुवात तर रात्री ९.३० पर्यंत च्या वेळापत्रक मध्ये सरांनी कधीच बदल केला नाही. मला आठवतेय सर नेहमी म्हणायचे '' माझ्या अतिप्रिय बालगोपाळांनो '' मग त्यांचे लेक्चर /भाषण सुरु व्हायचं. मुलांनी अभ्यासासारखं शरीर सुद्धा सुदृढ ठेवावं असा सरांचा कल असायचा मग श्रमदानं वर भर द्यायचे. आज जे वाडेगव्हाण पासून झाडे दिसत आहेत ती मुलांनी श्रमदानानी लावलेली आहेत त्याच मूळ कल्पना सरांची होती. अण्णांना देव मानून काम सुरु झाले.


नापास विद्यार्थ्यांना चांगल शिक्षण मिळावं चांगले संस्कार मिळावे हा आदरणीय अण्णांचा आग्रह असायचा त्याप्रमाणे राऊत सर मार्गदर्शन करायचे ह्या वसतिगृह मध्ये व्यसनमुक्ती पासून तर चांगली शिस्त, जादा अभ्यास करून घेऊन त्यांना पास होईपर्यंत सर थांबले नाहीत. घड्याळाकडे पाहून काम करायचं नाही तर पहाटे ५ ते रात्री ९.३० पर्यंत वेळापत्रक फुल्ल असायचं. त्यामुळे उनाड मुलं, नापास मुलं पास तर झालीच पण त्यांना चांगल्या संस्कारातून घडवलं गेलं. त्यांच्या घरचे म्हणायचे मुलामध्ये प्रगती झाली. त्याच श्रेय राऊत सरांना जाते. अण्णांचे पंचसूत्री प्रमाणे त्यांनी काम केले.शुद्ध आचार, शुद्ध विचार, निष्कलंक जीवन,जीवनात त्याग ,अपमान सहन करण्याची ताकद या पाच सूत्रानुसार सरांनी काम केले आणि विद्यार्थ्यांना घडवलं.

आज अण्णा आठवण काढत होते की सर राळेगणला पहिल्यांदा आले ते आणि त्यांची पत्नी हे मला यादवबाबा मंदिरात भेटले. अण्णांना शाळेतील जुन्या आठवणी आल्या. सरांनी निवृत्त झाले तरी घरी न जायचा निर्णय घेतला. तो क्षण आणि हिंद स्वराज आणि अण्णांना जीवन समर्पित केलेला प्रसंग आठवल्यावर अण्णांच्या डोळ्यातून अश्रू आले.

जवळ जवळ सर्वच माजी विद्यार्थी ट्रेनिंग सेंटर वर गेल्यानंतर अण्णांचे दर्शन घेतल्यानंतर ज्यांच्या चरणासमोर आम्ही नतमस्तक व्हायचो ते म्हणजे राऊत सर.

आज सर आपल्यात नाहीत पण सरांनी आपल्या मार्गदर्शनातून असंख्य विद्यार्थी व विदयार्थीनी घडवले आहेत. शाळेला आपल मंदिर मानून काम केल. माझ्यासारखे असंख्य माजी विद्यार्थी सरांनी घडवले आहेत. आदरणीय प्राचार्य स्व. राऊत सरांना सर्व आजी माजी विद्यार्थी यांच्याकडून **भावपूर्ण श्रद्धांजली.**

दत्ता आवारी, माजी विद्यार्थी




# पोलीस भरती प्रक्रिया पुढे ढकला

## ■ खा. नीलेश लंके यांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र ■ पावसाळयाच्या पार्श्वभूमीचा विचार करण्याची मागणी

**पारनेर : प्रतिनिधी**

**राज्य सरकारच्या वतीने येत्या १९ जुनपासून पोलीस भरती प्रक्रिया राबविण्यात येणार असून सध्या सुरू असलेल्या पावसाच्या पार्श्वभूमीवर ही भरती प्रक्रिया पुढे ढकलण्याची मागणी खासदार नीलेश लंके यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवून केली आहे.**



■ पावसाच्या पार्श्वभूमीवर येत्या १९ जुन पासून घेण्यात येणारी पोलीस भरती प्रक्रिया पुढे ढकलण्याच्या मागणीचे निवेदन उमेदवारांच्या वतीने खा. नीलेश लंके यांना देण्यात आले.

पावसामुळे ही चाचणी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी खा. नीलेश लंके यांची भेट घेऊन ही भरती प्रक्रिया पुढे ढकलण्याची मागणी केली होती. उमेदवारांच्या मागणीची दखल घेऊन लंके यांनी तात्काळ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवून उमेदवारांच्या अडचणींकडे त्यांचे लक्ष वेधले आहे.

खा.लंके यांनी पाठविलेल्या पत्रात नमुद करण्यात आले आहे की, सध्या पावसाळा सुरू असून दिवसभर पावसाचे तर काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पाऊस होत आहे. हवामान खात्यानेही पुढील काही दिवस पावसाचे असल्याचा अंदाज वर्तविलेला आहे. राज्यात पावसाचे वातावरण असल्याने, पाउस झाल्यानंतर पोलीस भरती मैदानी चाचणीवर त्याचा परिणाम होऊ शकतो.

मागील आठवडयापासून पाऊस पडत असल्याने भरती प्रक्रियेसाठी मैदान चाचणीचा उमेदवारांना सराव करता आलेला नाही. आतापर्यंत उमेदवारांनी मोकळया मैदानावर सराव केलेला असल्याने आता पावसामुळे चिखल झालेल्या मैदानावर चाचणी देणे त्यांना कठीण जाणार असल्याचे लंके यांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले आहे.

पावसात तसेच चिखलात मैदानी चाचणी देणे उमेदवारांसाठी धोक्याचे असून त्यातून दुखापत होऊन उमेदवार जायबंदी होण्याचीही भिती आहे. चाचणीच्या दिवशी अचानक पाऊस सुरू होऊन भरती प्रक्रिया प्रभावीत झाल्यास त्याचा परिणाम वर्षानुवर्षे भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांवर होणार आहे.

भरती प्रक्रियेच्या ठिकाणी पाउस असेल, तिथे पुरेशी व्यवस्था नसेल तर त्या ठिकाणी अस्वच्छता पसरून रोगराईलाही निमंत्रण मिळण्याची शक्यता नाकारता येणार नाही. पावसात भिजल्याने जंतुसंसर्ग होऊन भरतीसाठी आलेले तरूण आजारी पडू शकतात. या सर्व गोष्टींचा विचार करून भरती चाचणी प्रक्रिया पुढे ढकलण्याची उमेदवारांची मागणी आहे. या मागणीचा विचार करून ही प्रक्रिया पुढे ढकलण्याचा विचार करण्याची विनंती लंके यांनी केली आहे.

# तज्ञ मंडळींकडून पाठय पुस्तकांची सुंदर निर्मिती

## ■ पत्रकार नाना ढवळे यांचे प्रतिपादन ■ देवीभोयरे शाळेत पाठयपुस्तकांचे वितरण

**देवीभोयरे : प्रतिनिधी**

**शालेय विद्यार्थ्यांसाठी भाषा, विज्ञान, गणित आदी विषयांची पाठयपुस्तके ही शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञ मंडळींची सुंदर निर्मिती असते. शालेय विद्यार्थ्यांनी या पाठयपुस्तकांचा मनापासून अभ्यास करण्याचे आवाहन ज्येष्ठ पत्रकार नाना ढवळे यांनी केले.**

देवीभोयरे येथील बेलोटे वस्ती जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील बालवाडी तसेच पाहिली ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून पाठयपुस्तकांचे मोफत वितरण करण्यात आले. त्यावेळी प्रमुख वक्ते म्हणून साहित्यिक तथा ज्येष्ठ पत्रकार नाना ढवळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवीभोयरे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे संचालक गोपिचंद बेलोटे हे होते. त्यांनी बेलोटे वस्तीच्या शाळेच्या उभारणीमागील पार्श्वभूमी विषद केली. शाळेच्या विकासासाठी ग्रामस्थ आणि पालक म्हणून आमचे नेहमीच सहकार्य राहिले अशी ग्वाही दिली.

माता पालक समितीच्या अध्यक्षा रूपाली बेलोटे यांनी विद्यार्थ्यांना दोन हिताच्या गोष्टी सांगितल्या. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त मुख्याध्यापक तुकाराम मुळे हे होते. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुस्तके,



■ देवीभोयरे जिल्हा परिषद शाळेत ज्येष्ठ साहित्यिक तथा पत्रकार नाना ढवळे यांनी विद्यार्थ्यांना

वहया, खाउचे वितरण करण्यात आले. नव्या वर्गात प्रवेश म्हणून विद्यार्थ्यांच्या स्वागताखातर गुलाबपुष्प भेट देण्यात आले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानदेव मुळे यांनी विद्यार्थ्यांसाठी खाउचे नियोजन केले तर रवींद्र राऊत आणि नवनाथ थोरात यांनी वहया, पेन, पेन्सिल, खोड रबर आदी शालेपयोगी साहित्याची भेट दिली.

यावेळी अंगणवाडी सेविका निर्मला गायकवाड, सुरेश मुळे, विक्रम बेलोटे, गणेश देशमुख, अश्विनी मुळे, ग्रामस्थ, पालक उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक अरूण गजरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर शिक्षक अमोल लोंढे यांनी आभार प्रदर्शन केले.

### हल्लीचे विद्यार्थी भाग्यवान !

**यावेळी बोलताना ढवळे म्हणाले, आम्हीही गावाकडील जिल्हा परिषदेच्या शाळेतच शिकलो. त्यावेळी शाळेत शिकण्यासाठी लागणारी आमची वहया पुस्तके आमच्या पालकांनाच विकत घ्यावी लागत. वर्गामध्ये सारवलेल्या भुईवर बसावे लागे. बसण्यासाठी आम्हाला बाके नव्हती. हल्लीची शाळकरी मुलं मात्र भाग्यवान आहेत. आता शासनाकडून विद्यार्थ्यांसाठी मोफत शालेय साहित्य मिळते. बसण्यासाठी बाके मिळतात. अल्पोपहार दिला जातो. समाजातील काही कदरदान लोकही शाळेसाठी रोख किंवा वस्तू स्वरूपात देणग्या देत असतात. असे ते म्हणाले.**

---

# अण्णांच्या वाढदिवसानिमित्त बिजारोपण, वृक्षारोपण

## पत्रकार संघ, आडवाटेचं पारनेर तसेच शिक्षण संस्थांचा उपक्रम

**पारनेर : प्रतिनिधी**



**पारनेर तालुक्याचं भुषण ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या वाढदिवसानिमित्त १५ जुन रोजी पारनेर शहरानजीक पर्यटकांना आकर्षित करणाऱ्या सिध्देश्वर मंदिर डोंगरावर बिजारोपण व वृक्षारोपण करण्यात येऊन सामाजिक संदेश देण्यात आला. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी हजारो हात सरसावले.**

पारनेर तालुका पत्रकार संघ, आडवाटेचं पारनेर, पारनेर पब्लिक स्कुल, न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजचे राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांनी संयुक्तपणे या उपक्रमाचे आयोजन केले होते. शनिवारी सकाळी ९ वाजल्यापासून शेकडो विद्यार्थी सिध्देश्वर मंदिर परिसरातील डोंगरावर एकवटले होते.

सामाजिक वनीकरण विभागाचे अधिकारी भलावी, पारनेर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मण मतकर, उपप्राचार्य डॉ. अनिल आठरे, राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रमुख प्रा. भरत डगहे, प्रा. हरिश शेळके, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा. आहेर, बाळासाहेब इघे, आडवाटेचं पारनेरचे प्रमुख प्रा. तुषार ठुबे, पारनेर पब्लिक स्कुलचे प्रा.दिपक जाधव, राहुल ठुबे, तालुका पत्रकार संघाचे उपक्रम प्रमुख विनोद गोळे, उपाध्यक्ष सुरेंद्र शिंदे, अशोक गायकवाड, प्रा. संकेत ठाणगे, मा. सैनिक सचिन गायखे, हरिश्चंद्र व्यवहारे, सुभाष परांडे, महेश शिरोळे यांच्या उपस्थितीत या उपक्रमास प्रारंभ करण्यात आला.

यावेळी कृष्णा औटी, समिक्षा गट, आरूषी सोनावळे, कार्तिकी गुंड, प्रांजल फापाळे यांनी पद्मभुषण अण्णा हजारे यांच्या जीवनावरील प्रसंग कथन केले. विद्यार्थ्यांनी झाडे लावण्यासाठी खड्डे खोदून वृक्षारोपण केले. हजारो बियांचे यावेळी रोपण करण्यात आले. या मोहिमेचे प्राचार्य डॉ. लक्ष्मण मतकर, प्राचार्य गीताराम म्हस्के यांनी कौतुक करून सातत्याने असे उपक्रम राबविण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

### सिध्देश्वर परिसर हिरवाईने नटणार

**पारनेर शहरापासून चार किलोमीटर अंतरावर असलेला सिध्देश्वर मंदिर परिसर निसर्गरम्य आहे. दरीमध्ये पुरातन सिध्देश्वर मंदीर असून चोहोबाजूंनी हिरवाईने नटलेले डोंगर, तसेच पावसाळयातील धबधबे पर्यटकांना आकर्षित करतात. या बिजारोपण व वृक्षारोपणामुळे हा परिसर हिरवाईने नटणार आहे.**

# खा.लंकेंच्या माध्यमातून सर्वसामान्यांना न्याय मिळेल

## उद्योजक शिवाजीराव लंके यांचा विश्वास

**निघोज : प्रतिनिधी**



**मागील पावणेपाच वर्षात आमदारकीच्या माध्यमातून खा. नीलेश लंके यांनी कोट्यवधी रुपयांची विकासकामे मार्गी लावली आहेत.मळगंगा देवीचा आशीर्वाद त्यांच्या पाठीशी आहे. आमदार ते खासदार हा प्रवास होत असताना देशाच्या संसदेत सर्वसामान्य जनतेचे व शेतकऱ्यांचे प्रश्न मांडून लोकांना खऱ्या अर्थाने न्याय मिळणार असल्याचा विश्वास लोकनेते नीलेश लंके प्रतिष्ठानचे मुख्य पदाधिकारी व किशन कन्हैया दूध उद्योग समूहाचे अध्यक्ष शिवाजीराव लंके यांनी व्यक्त केला.**

लंके तसेच सामाजिक कार्यकर्ते दिलीपराव ढवण, निघोज ग्रामपंचायत सदस्य योगेश वाव्हळ , पारनेर तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष भास्करराव कवाद यांनी मळगंगा यात्रा उत्सव समिती, निघोज परिसर वाडी वस्ती व ग्रामस्थ तसेच संत सावता माळी अहिल्यानगर

जिल्हा संघटन समिती तसेच पारनेर तालुका पत्रकार संघ यांच्या वतीने खासदार लंके यांचा हंगे येथील निवासस्थानी सत्कार करण्यात आला यावेळी ते बोलत होते. गोरक्ष कोल्हे, तेजस कवाद तसेच मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवाजीराव लंके यावेळी म्हणाले गेली पावणेपाच वर्षात विधानसभा मतदारसंघात काम करताना खासदार लंके यांनी दोन हजार कोटींची विकासकामे केली आहेत. यामध्ये शेतकऱ्यांचा विजेचा प्रश्न,आरोग्याच्या प्रश्नाबरोबरचजलसिंचन योजना, रस्त्याची कामे, जिल्हा परिषद शाळांना अत्याधुनिक करीत मोफत शिक्षण मिळण्यासाठी प्रयत्न केले आहेत अशाप्रकारे पारनेर - नगर विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास केला आहे. विविध तिर्थक्षेत्र, पर्यटन स्थळ यासाठी मोठा निधी उपलब्ध करून विक्रमी अशाप्रकारे दोन हजार कोटींची विकासकामे करुन राज्यात नावलौकिक मिळविला आहे म्हणून मोठ्या धनशक्ती विरोधात लंके हे खासदार म्हणून निवडून येऊन देशात त्यांनी नावलौकिक मिळविला असल्याचे गौरवोद्गार त्यांनी व्यक्त केले.

यावेळी खासदार नीलेश लंके यांनी सांगितले की सर्वसामान्य जनतेचा विकास हेच आपले ध्येय असून राज्यातील सर्व सामान्य जनतेच्या प्रश्नांना तसेच सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या हितासाठी संसदेत भक्कमपणे काम करीत सत्ताधाऱ्यांना वठणीवर आणण्याचे काम आपण करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते दिलीपराव ढवण यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले शेवटी ग्रामपंचायत सदस्य योगेश वाव्हळ यांनी आभार मानले.

# वृक्ष लागवड हा तालुक्यात उत्सव व्हावा

## ■ सुजित झावरे पाटील यांची अपेक्षा वासुंदे येथे देवकृपा ■ फाउंडेशनच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम

**वासुंदे :प्रतिनिधी**



**विज्ञान युगाच्या चर्चा करत असताना भौतिक सुखासाठी होणारी प्रचंड वृक्षतोड ही मानवाच्या भावी काळातील अधोगतीची चाहुल आहे. कळतय सगळ्यांना पण सोयीस्कर दुर्लक्ष आपण या गोष्टीकडे करतोय. विशेषतः शहरात मोठया इमारती, रस्ते, सुशोभिकरण या नावाखाली होणारी बेसुमार वृक्षतोड ही आपण आपल्या पुढच्या पिढीला दिलेला शाप ठरणार आहे. असे मत जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी व्यक्त केले वासुंदे येथे देवकृपा फाउंडेशनच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले यावेळी ते बोलत होते.**

पुढे बोलताना झावरे पाटील म्हणाले वृक्षारोपण करणे ही काळाची गरज आहे पारनेर तालुक्यामध्ये देवकृपा फाउंडेशनच्या माध्यमातून आम्ही येत्या काळात दहा हजारापेक्षा जास्त झाडे लावण्याचा उपक्रम हाती घेणार आहे त्याची सुरुवात आज वासुंदे येथून आम्ही केली आहे हा उपक्रम पारनेर तालुक्यात उत्सव व्हावा या सदर उपक्रमात आवळा, बोखर, कडीपता, कडुलिंब, चिंच, आंबा, अर्जुन साताडा, जाभंळ, वड, शिसु, कांचन, पिंपळ या वनऔषधी वनस्पतीचा वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. असेही यावेळी सुजित झावरे यांनी बोलताना सांगितले.

वासुंदे येथे वृक्षारोपण करण्यात आले यावेळी रणजित पाटील, शरद पाटील, भाऊसाहेब सैद, उपसरपंच शंकर बर्वे, चेअरमन नारायण झावरे, व्हा चेअरमन रा. बा. झावरे, दिलिप पाटोळे, बाळासाहेब झावरे, पोपटराव झावरे, लहानभाऊ झावरे, पोपटराव हिंगडे, शांताराम झावरे, विलास हिंगडे, लक्ष्मण झावरे, स्वप्निल झावरे, डॉ प्रसाद झावरे, दत्तात्रय बर्वे, रामचंद झावरे, पोपटराव बर्वे, निखिल दाते, शंकर झावरे, गणेश झावरे, मनोज झावरे, संग्राम झावरे, मारूती उगले सर, अमोल पोटघन, विकास झावरे, सुरेश शिंदे, बाळासाहेब झावरे, अशोक झावरे, साधना जगदाळे, उज्वला हिंगडे, शिवाजी गायखे, मच्छिंद्र झावरे, अशोक बर्वे, पंढरीनाथ हिंगडे तसेच गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने या उपक्रमात उपस्थितीत होते.

### सुजित झावरे पाटील यांचा संकल्प

**वृक्षारोपण व संवर्धन हे अत्यंत काळानुरूप गरजेचे आहे हे ओळखून देवकृपा फाउंडेशनच्या माध्यमातून सुजित झावरे पाटील यांच्या संकल्पनेतून पारनेर तालुक्यातील विविध गावांमध्ये दहा हजारापेक्षा जास्त वृक्षांची लागवड करण्याचा मानस यावर्षी व्यक्त करण्यात आला या उपक्रमाला वासुंदे येथून सुरुवात झाली.**

### युवकांना प्रेरणादायी उपक्रम

वृक्षारोपण व संवर्धन ही देवकृपा फाउंडेशनच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात तालुक्यात चळवळ उभी राहावी सुजित झावरे पाटील यांनी हाती घेतलेला हा सामाजिक उपक्रम आम्हा युवकांना प्रेरणा देणारा आहे. वासुंदे व परिसरामध्ये यापुढील काळात वृक्ष रोपण व संवर्धन करण्यामध्ये आम्ही युवक स्वतः सहभागी होऊन सक्रिय राहणार आहे.

**इंजि. निकील दाते**
(देवकृपा फाउंडेशन)

---

# लंकेंच्या विजयानंतर संत बाळूमामांची नवसपूर्ती!

## ■ नवसपूर्तीनंतर कोल्हापुरकर खा. लंके यांच्या भेटीला ■ काठी, घोंगडी, फुले व प्रसाद देत केला सन्मान

**नगर : प्रतिनिधी**

**नीलेश लंके लोकसभेच्या निवडणूकीत विजयी व्हावेत यासाठी संत बाळूमामांकडे केलेल्या नवसाची पुर्ती कोल्हापुर जिल्हयाच्या कागल तालुक्यातील शेंडुरचे मा. उपसरपंच तसेच लंके यांचे चाहते निखिल निंबाळकर चाहत्याने केली. नवसपूर्तीनंतर निंबाळकर यांनी नगर येथे येत खा. लंके यांचा काठी, घोंगडी, बाळूमामांच्या समाधीवरील फुले तसेच प्रसाद देउन सन्मानही केला.**




नीलेश लंके यांचा चाहता वर्ग संपूर्ण महाराष्ट्रभर असून लंके लोकसभा निवडणूकीच्या रिंगणात उतरल्यानंतर अनेकांनी त्यांच्या विजयासाठी नवस केले होते. त्यापैकीच एक निखिल निंबाळकर यांनी संत बाळूमामांकडे केलेल्या नवसाची पुर्तता केली आहे.

आदमपुर येथे संत बाळूमामांचा नवसपूर्ती केल्यानंतर निंबाळकर हे नगरमध्ये आले. लंके यांच्या भेटीनंतर त्यांना गहिवरून आले.निंबाळकर यांच्यासोबत आलेले लक्ष्मण गोरडे, संजय निंबाळकर, शंकर पोवार हे लंके यांच्या भोवती असलेला माणसांचा गराडा पाहून अचंबित झाले. माणसांच्या गर्दीतूनही कोल्हापुरकरांना ओळख देत लंके यांनी त्यांना वेळ देऊन त्यांचा सन्मान स्विकारला.

खासदारसाहेबांनी आमचे विशेष आभार माणल्याचे सांगत त्यांनी दिलेले प्रेम, आपुलकी आमच्या मनाला समाधान देऊन गेले. आमच्यासारख्या सामन्य माणसांकडे खूप सारी गर्दी असतानाही त्यांचे आमच्याकडे लक्ष होते हा त्यांचा गुण आम्हाला भावला. या प्रसंगामुळे आमचे खा. लंके यांच्यावरील प्रेम व्दिगुणीत झाल्याच्या भावना कोल्हापुरकरांनी व्यक्त केल्या. लंके यांचे सहकारी अशोक तथा बबलूशेठ रोहोकले यांच्याप्रतीही त्यांनी कृतज्ञता व्यक्त केल्या.

# ढोकीचा तरुण सायकल प्रवास करत पोहोचला केदारनाथला!

## ■ केदारनाथांच्या दर्शनाने मी अखेर आनंदी झालो ■ इंजिनिअर प्रविण धरम यांची प्रतिक्रिया

**ढोकी : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील ढोकी या छोट्याशा गावातील तरुण इंजिनिअर प्रविण धरम यांने दोन हजार किलोमीटर सायकल प्रवास करत केदारनाथला पोहचला आहे. प्रवीणने ढोकी ते केदारनाथ दोन हजार किलोमीटर किमी प्रवास १२ मे रोजी सुरू केला आणि तो ५ जून रोजी केदारनाथ येथे पोहचला.**

या प्रवासाला २३ दिवस लागले असुन हा प्रवास त्याने महाराष्ट्र, मध्यप्रदेश, राजस्थान, उत्तरप्रदेश, व उत्तराखंड या ५ राज्यांमधुन केला ऊन, वारा, पावसात त्याने सायकल प्रवास करत समाजाला सायकल प्रवास करण्याचा संदेश दिला आहे. प्रवासावेळी झाडांचे महत्त्व त्याच्या लक्षात आल्याने झाडे लावा व ती जगवा असा संदेश देखील त्याने दिला आहे.

प्रविण सध्या केदारनाथ येथेच आहे. ५ ते ६ दिवसांत तो गावी परतणार असून संपूर्ण पारनेर तालुक्यातून त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होताना दिसत आहे. या सायकल प्रवासामुळे प्रवीणने आई, वडील, भाऊ त्याच्या ढोकी गावाबरोबर तालुका व जिल्हाचे नाव उज्ज्वल केले. या प्रवासासाठी प्रविण याने स्वतः केदारनाथ दर्शनाचा निर्णय घेतला व त्यासाठी त्याचे आई वडील मित्र परिवार यांनी त्याला पाठबळ दिले होते. प्रविण यांच्या आगमनाची आई वडील मित्र परिवार ग्रामस्थ आतुरतेने वाट पाहत असून त्याच्या स्वागतासाठी तरूणवर्ग सज्ज झाला आहे.

### प्रविणचा आम्हाला अभिमान

प्रविण धरम हा आमचा सहकारी अतिशय धार्मिक वृत्तीचा सर्वांसोबत नेहमीच मिळून मिसळून राहणारा देव, देश व धर्म याबद्दल त्याच्या मनामध्ये भक्ती भाव आहे. केदारनाथ सारख्या धार्मिक ठिकाणी दोन हजार किलोमीटरचा सायकल प्रवास करत तो २३ दिवसांमध्ये पोहोचला. त्याच्या या परमेश्वर भक्तीचा आम्हा गावकऱ्यांना अभिमान आहे.

**कैलास नऱ्हे**
ढोकी ग्रामस्थ

### माझी इच्छा पूर्ण झाली

केदारनाथ महा शंभूचे दर्शन व्हावे ही माझी मनोमन इच्छा होती आणि ही इच्छा पूर्ण करण्यासाठी आपण सायकल प्रवास करत जाऊन देवाला भेटावे हे मी मनाशी खुणगाठ बांधली आणि घरापासून दोन हजार किलोमीटर प्रवास असून सुद्धा मी तो यशस्वी पूर्ण केला आणि केदारनाथ महा शंभूच्या दर्शनाने माझे मन आनंदी झाले आहे.

**इंजि. प्रविण धरम**

